cmyk

## संपादकीय

### निधी वाटपातून महायुतीत वादाची ठिणगी

सत्तेत तीन पक्ष एकत्र आल्याने पुन्हा एकदा निधी वाटप विभागाच्या फाईल्सवरून वाद वाढला आहे. अजित पवार गटाच्या नेत्यांच्या फाईल्स मुख्यमंत्री कार्यालयात अडविण्यात आल्याने अजित दादांनीही मुख्यमंत्र्यांच्या नगरविकास खात्याच्या फाईली वाचल्याशिवाय सही करायची नाही अशी भूमिका घेतली. त्यामुळे निवडणुकीच्या तोंडावर महायुती सरकारमधील अंतर्गत धुसफूस बाहेर आल्याचे दिसते. राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या मंत्र्यांच्या आणि नेत्यांच्या अनेक फाईल्स मुख्यमंत्री कार्यालयात अडवण्यात आल्या आहेत म्हणे. शिवभोजन थाळीचा वाढीव प्रस्ताव आणि यासारख्या १८ ते २० महत्त्वाच्या फाईल्स अडकल्या आहेत. त्यावरून महायुतीत वादाची ठिणगी पडली आहे.

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

### अवकाशात सुनीता विलियम्स अडकल्या

नवी दिल्ली : अवकाशात अडकून पडलेल्या सुनीता विलियम्स यांच्याबद्दल एक वाईट बातमी आहे. त्यामुळे नासाच्या अडचणी सुद्धा वाढल्या आहेत. बोइंगच्या स्टारलायनर स्पेसक्राफ्टमध्ये बिघाड झाल्याने सुनीता विलियम्स अवकाशात अडकून पडल्या आहेत. नासाचा सुनीता विलियम्स आणि बुच विल्मोर यांना पृथ्वीवर परत आणण्यासाठी वेगवेगळ्या पर्यायांचा विचार करत आहेत. दोघेही सध्या आंतरराष्ट्रीय अवकाश तळावर आहेत.

बीड - महाराष्ट्र वर्ष - ४ अंक-११७ रविवार दि.१८ ऑगस्ट २०२४ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 • पाने- ६ किंमत ३ रूपये

# बांगलादेश संकटामुळे टोमॅटो निर्यात अन् किमतीत मोठी घसरण!

**नवी दिल्ली। वृतंस्था**

शेजारच्या बांगलादेशातील राजकीय अशांततेमुळे शेतकऱ्यांवर परिणाम झाला आहे. **निर्यातक्षम पहिल्या दर्जाच्या टोमॅटोच्या किमतीत जवळपास ६० टक्क्यांनी घसरण झाली आहे. बंगळुरूपासून ९० किमी अंतरावर असलेले कोलार हे आशियातील दुसऱ्या क्रमांकाचे टोमॅटो मार्केट म्हणून ओळखले जाते आणि ते बांगलादेश, इंडोनेशिया आणि अनेक भारतीय बाजारपेठांमध्ये या आवश्यक भारतीय खाद्यपदार्थांचा पुरवठा करते त्या ठिकाणी टोमॅटोचा साठा पडून आहे.**



माहितीनुसार टोमॅटोची खरेदी सुमारे ५०% कमी केली आहे. त्यामुळे निर्यात-दर्जाच्या ( पहिल्या दर्जाच्या टोमॅटोच्या किमती जवळपास ६० टक्क्यांनी घसरल्या आहेत. कोलारमधून दररोज सुमारे ४० ट्रक भरलेले टोमॅटो बांगलादेशला पाठवले जातात. गेल्या आठवडाभरापासून सर्व मालवाहतूक बंद करण्यात आली आहे. आता वाटेतल्या बाजारात टोमॅटो विकावे लागत आहेत. निर्यात-गुणवत्तेचे टोमॅटो, जे आंतरराष्ट्रीय बाजारात साधारणतः ३५ रुपये प्रति किलो दराने विकले जातात, ते आता आंध्र प्रदेश, झारखंड, ओडिशा आणि पश्चिम बंगालमध्ये विकले जात असून केवळ ८ ते १० रुपये किलो दराने त्याची विक्री होत आहे. दुसरे म्हणजे टोमॅटो पिकाला अलीकडेच लीफ कर्ल रोग पसरवणाऱ्या घातक पांढऱ्या माशीच्या हल्ल्याचा सामना करावा लागला आणि त्यामुळे टोमॅटोचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. त्यामुळे सामान्यतः महाराष्ट्र, छत्तीसगड, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, बांगलादेश आणि इंडोनेशियाच्या बाजारपेठेत पाठवल्या जाणाऱ्या टोमॅटोच्या पुरवठ्यावर परिणाम झाला आहे.

## थोडक्यात...

### चव्हाण यांच्या कन्या विधानसभा लढवणार

नांदेड-चव्हाणांची तिसरी पिढी राजकारणात येण्याची शक्यता आहे. भाजप खासदार अशोक चव्हाण यांची मुलगी श्रीजया चव्हाण यांनी विधानसभेचे रणशिंग फुंकले आहे. भोकर मतदारसंघातून श्रीजया चव्हाण या लढण्यासाठी इच्छूक आहेत.

### लाडक्या बहिणींना डबल ऑफर-पटोले

मुंबई- राज्यात काँग्रेसचे सरकार आले तर कर्नाटकसारखी महालक्ष्मी योजना सुरू करू, असा दावा प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे. महाराष्ट्र सरकारच्या लाडकी बहिण योजनेच्या विरोधात काँग्रेसने ही नवी रणनीती आखली असल्याचे बोलले जात आहे.

### राहुल गांधी यांचे नागरिकत्व धोक्यात

नवी दिल्ली- भाजप नेते सुब्रह्मण्यम स्वामी यांनी दिल्ली उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असून राहुल गांधी यांचे नागरिकत्व रद्द करण्यासाठी आदेश देण्याची मागणी केली आहे. पुढच्या आठवड्यात या याचिकेवर सुनावणीची शक्यता आहे.

### मराठा बांधवांचा सुप्रिया सुळे यांना घेराव

जळगाव- मराठा बांधवांनी खासदार सुप्रिया सुळे यांना घातला घेराव घातला. राष्ट्रवादी शरद पवार पक्षाने मराठा आरक्षण संदर्भात आपली भूमिका स्पष्ट करावी, सकल मराठा समाजाच्या वतीने निवेदन देऊन खासदार सुप्रिया सुळे यांच्याकडे मागणी यावेळी करण्यात आली. सुप्रिया सुळे यांच्या आगमनावेळी मराठा बांधवांची जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी त्यांना मागण्यांचे निवेदन दिले.

# लाडक्या बहिणीचा इम्पॅक्ट; महायुतीलाच राज्यात सर्वाधिक पसंती

## एआय सर्वेक्षणाचा आश्चर्यजनक निकाल; आघाडीची पिछेहाट



### कोणत्या पक्षाला कशी पसंती?

कोणता पक्ष महाराष्ट्रात सरकार बनवू शकतो, असा प्रश्न या सर्वेक्षणात विचारला असता, ३८ टक्के लोकांनी भाजपला पसंती दिली आहे. तर, २२ टक्के लोकांनी शिवसेना शिंदे गटाला मत देणार असल्याचे म्हटले आहे. तर, उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेला १७ टक्के लोकांनी मत दिले आहे. या सर्व्हेक्षणात १४ टक्के जनतेने काँग्रेसला पसंती दिली असून केवळ ९ टक्के लोकांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला पहिल्या क्रमाकांची पसंती दिली आहे. दरम्यान, झी न्यूजच्या माध्यमातून मराठीमध्ये पहिल्यांदाच एआय अँकरच्या माध्यमातून हे सर्वेक्षण झाले आहे.

**मुंबई । प्रतिनिधी**

**केंद्रीय निवडणूक आयोगाने पत्रकार परिषद घेऊन जम्मू काश्मीर आणि हरयाणा विधानसभा निवडणुकांची घोषणा केली. या घोषणेनंतर आता महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांचे वेध सर्वांना लागले आहेत. महाराष्ट्रातील एआयचा पहिला सर्व्हे समोर आला असून जनतेने महायुतीला सर्वाधिक पसंती दाखवली आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण या योजनेचा इम्पॅक्ट दिसून आला असून या योजनेचा विधानसभा निवडणूकीत महायुतीला फायदा होताना दिसत आहे. तर महाविकास आघाडीची पिछेहाट होणार असल्याचे संकेत आहेत.**

राज्यात महाविकास आघाडी व महायुती असा सामना निश्चित झाला असून लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला घवघवीत यश मिळाल्याने महाविकास आघाडीमधील तिन्ही पक्षांचा आत्मविश्वास दुणावल्याचे दिसून येत आहे. दुसरीकडे महायुती सरकारने लाडकी बहीण योजनेची अंमलबजावणी करत महिला वर्गास आपलसं करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे, यंदाची निवडणूक अत्यंत चुरशीची होईल, असेच दिसून येते. लोकसभेला महायुतीचा मोठ्या पराभवाचा सामना करावा लागल्याने विधानसभेचे चित्र पान २ वर

### जनतेसाठी महत्वाचा मुद्दा कोणता?

*राज्यातील विधानसभा निवडणुकीत सर्वात मोठा मुद्दा कोणता, असा प्रश्न विचारला असता विकासाच्या मुद्द्यावर २५ टक्के लोकांनी कौल दिला असून २० टक्के लोकांनी कल्याणकारी योजनेबाबत आपले मत मांडले आहे. तर, राज्यातील मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर १० टक्के लोकांनी विधानसभा निवडणुकीतील महत्त्वाचा मुद्दा असल्याचे भाष्य केले आहे. तसेच, १५ टक्के नागरिकांनी बेरोजगारी हा महत्त्वाचा मुद्दा असल्याचे म्हटले आहे. तर, भ्रष्टाचार आणि महागाईच्या मुद्द्यावरही अनुक्रमे १५-१५ टक्के लोकांनी कौल दिला.*

# अजित पवारांच्या पक्षात ४० गाड्या वाटल्या

### पैसा कुठून आला?,अंजली दमानिया यांचा थेट सवाल

**पुणे । प्रतिनिधी**

**अजित पवार यांची गुलाबी यात्रा पाहिली. पक्षामध्ये ४० गाड्या वाटल्या. हा पैसा कोठून आला? अशी विचारणा अंजली दमानिया यांनी केली.**



अंजली दमानिया पुढे म्हणाल्या की, पवारांसोबत फारकत घेतल्यानंतर हा पैसा कुठून आला? तुमच्या आई, बहिणीला रिचार्ज करणारी बाई म्हटलं तर चालेल का? अशी विचारणा सुद्धा त्यांनी केली. राज्याने भ्रष्टाचाराने वाट लावली असून पैसा खिरापतीसाठी वाटला जात असल्याची टीका सुद्धा अंजली दमानिया यांनी केली. लाडकी योजना माध्यमातून लोकांना पैसे मिळावेत, आम्हाला काही प्रॉब्लेम नाही, असे त्यांनी सांगितले. माझ्याकडे सर्व नेत्यांचे राजकीय डिटेल्स असून यांच्या विरोधात मी लढणार म्हणजे लढणार असा इशारा अंजली दमानी यांना दिला. आपल्या पान २ वर

# तुम्ही आम्हाला बळ द्या, आम्ही तुम्हाला १५०० ऐवजी ३ हजार देऊ

## मुख्यमंत्री यांची मोठी घोषणा; एकाच वेळी १ कोटीपेक्षा जास्त लाडक्या बहिणींना पैसे वितरित




**पुणे । प्रतिनिधी**

**तुम्ही आम्हाला बळ द्या, आम्ही तुम्हाला १५०० रुपयाऐवजी दरमहा ३ हजार रुपये देऊ, अशी मोठी घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेचा शनिवारी पुणे येथे शुभारंभ झाला. यावेळी ते बोलत होते. राज्यातील एक कोटीपेक्षा जास्त लाडक्या बहिणींच्या बँक खात्यात ३००० हजार रुपये एकाच वेळी जमा झाले.**

पुण्यात शनिवारी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा शुभारंभ करण्यात आला. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार उपस्थित होते. पुण्यातील या कार्यक्रमावेळी केलेल्या भाषणादरम्यान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेबद्दल एक मोठी घोषणा केली. यावेळी त्यांनी आगामी विधानसभा निवडणुकीचाही उल्लेख केला. तुम्ही आम्हाला बळ द्या, आम्ही तुम्हाला १५०० रुपयाऐवजी ३ हजार रुपये दर महिन्याला पान २ वर

### १ कोटी ३ लाख महिलांच्या खात्यात पैसे-फडणवीस

सुरुवात केली तरी पैसे क्रेडिट करणे सुरू करा असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. बहिणी खाली हात जाता कामा यने असे मुख्यमंत्री म्हणाले. आतापर्यंत १ कोटी ३ लाख महिलांच्या खात्यात पैसे गेले आहेत. प्रत्येकाच्या खात्यात पैसे आल्याशिवाय योजना बंद होणार नाही. हा आमचा निर्धार आहे. ३१ जुलैपर्यंतचे फॉर्म घेतले त्याचे पैसे आले. आता ३१ ऑगस्टच्या फॉर्मची छाननी होईल तेव्हा या महिलांना जुलै, औगस्ट आणि सप्टेंबरचे पैसे येतील. ही खटाखट योजना नाही तर फटाफट योजना आहे. थेट पैसे खात्यात जातात, हे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.

### विनोद तावडेंवर मोठी जबाबदारी

नवी दिल्ली : दिल्लीत भाजपच्या महत्वाच्या पदाधिकाऱ्यांची महत्वाची बैठक पार पडली. यावेळी विनोद तावडे यांच्यावर मोठी जबाबदारी देण्यात आली आहे. भाजपच्या सदस्यता नोंदणी अभियानाच्या प्रमुखपदी विनोद तावडे यांची निवड करण्यात आली आहे. विनोद तावडे यांच्यावर आणखी एक मोठी जबाबदारी देण्यात आली आहे. त्यामुळे आता येत्या काळात भाजपचा पक्ष विस्तारासाठी भर असल्याचे दिसत आहे.



## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१३ ऑगस्ट २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : ७.०० क्विंटल | २,३०० | २,६३५ | २,४६८ |
| ज्वारी/हायब्रिड :५९.५० क्विंटल | २,१३१ | २,६०१ | २,३२० |
| मूग :१.५० क्विंटल | ७,७०० | ७,७०० | ७,७०० |
| तूर : २.०० क्विंटल | ७,७०१ | ७,७०१ | ७,७०१ |
| उडीद : २.५० क्विंटल | ४,९०१ | ७,४०० | ६,१५० |
| बाजरी: २८.०० क्विंटल | २,४७१ | ३,३९० | २,७५० |
| चिंच/लोकल: २०.०० क्विंटल | १,१०० | ३,५५० | २,३२५ |
| सोयाबीन: ३१.०० क्विंटल | ४,२०० | ४,२०० | ४,२०० |
| हरभरा: ८.०० क्विंटल | ६,५८० | ६,५८० | ६,५८० |

# राजकारणात सत्तेत असो वा नसो परंतु माझा कार्यकर्ता कुणाच्या दारात लाचार होऊन गेला नाही - सुरेश धस

**आष्टी । प्रतिनिधी**

**१९९७ सालापासून राजकारणात आहे तेव्हापासून ते आत्तापर्यंत मी जो जो कार्यकर्ता म्हणून माझ्याशी जोडला गेला तो आजही माझ्यावर जीवापाड प्रेम करतो शिवाय माझ्या राजकीय प्रवासात मी सत्तेत असो अथवा नसो मात्र हा कार्यकर्ता कायम माझ्यासोबत राहिला आणि आहे तो लाचार होऊन कुणाच्या दारात गेला नाही.म्हणून मला माझ्या कार्यकर्त्यांचा अभिमान वाटतो असे मत माजी मंत्री सुरेश धस यांनी व्यक्त केले.तालुक्यातील पारगाव जोगेश्वरी,आष्टी शहर, मुर्शदपुर व धामणगाव गणात आयोजित जनसंवाद**



**मेळाव्या प्रसंगी ते बोलत होते.**

पुढे बोलताना धस म्हणाले की,कुणी किती मोठा झाला असेल,कुणी कितीही संपत्ती कमावलेली असेल मी मात्र माझ्या राजकीय जीवनात जीवा भावाची माणसं कमावली.म्हणूनच आष्टी मतदार संघात प्रत्येक बूथ वर माझा माणूस तुम्हाला दिसतो हीच माझी खरी ताकद आहे.सध्या मतदार संघात अनेक विधानसभेसाठी उत्सुक आहेत माझे वैयक्तिक मत आहे सर्वांनी उभे राहिले पाहिजे म्हणजे ज्याला त्याला आपली कुवत पान २ वर

# पोलिस अधिकाऱ्यांच्या बदल्या

### एसपी अविनाश बारगळ यांनी काढले आदेश; आष्टी, माजलगाव ठाण्याला मिळाले कारभारी

**बीड । प्रतिनिधी**

**पोलिस अधिक्षक अविनाश बारगळ यांनी पदभार घेताच जिल्ह्यातील अवैध धंदे, चोऱ्या यांच्या विरोधात मोहिम उघडली. शनिवारी पोलिस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश काढण्यात आले असून माजलगाव आणि आष्टी ठाण्याला कारभारी मिळाले आहेत. आष्टीला पोलिस निरीक्षक सोमनाथ जाधव तर माजलगाव शहर ठाण्याला पोलिस निरीक्षक राहूल सुर्यतळ यांची बदली करण्यात आली आहे.**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर पोलिस अधिक्षक अविनाश बारगळ यांनी अधिकाऱ्याच्या बदल्यांचे आदेश काढले असून सहाय्यक पोलिस निरीक्षक महेंद्रसिंग ठाकुर यांना नियंत्रण कक्षातून अप्पर पोलिस अधिक्षक, आंबाजोगाई यांचे वाचक, सपोनि गजानन क्षीरसागर यांची छत्रपती संभाजीनगरहून शिवाजी नगर, बीड येथे, पान २ वर

# महाराष्ट्राची निवडणूक जाहीर होत नाही हा विरोधाभास

## शरद पवार यांचा टोला, शांतता व सामंजस्य राखण्याचे आवाहन



**नागपूर । प्रतिनिधी**

**बांग्लादेशमध्ये सत्तांतर झाले. त्या अगोदर मोठा उठाव झाला. परंतु, त्याचे परिणाम महाराष्ट्रात उमटतील, असे कधी वाटले नव्हते. याच्या खोलात मी जाऊ इच्छित नाही. पण आज समाजातील सर्व घटकांमध्ये एकवाक्यता आणि सामंजस्याची आवश्यकता आहे. असे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी नागपूर मध्ये पत्रकारांशी संवाद साधताना म्हटले आहे.**

शरद पवार पुढे बोलताना म्हणाले की, महाराष्ट्रात जे काही घडले, ते राज्याच्या हिताचे नाही. राज्यात शांतता प्रस्थापित करायची असेल तर समाजकारण आणि राजकारणातील व्यक्तींनी संयमाचा पुरस्कार करावा आणि शांतता कशी राहिल, याबद्दलची खबरदारी घ्यावी, असेही यावेळी त्यांनी सांगितले.

पुढे बोलताना शरद पवार म्हणाले की, शासनाचे धोरण, शासनाची कारवाई, गृहखात्याची जबाबदारी यावर भाष्य करता येईल. मात्र आज मला शांतता आणि सौहार्द याचे जास्त महत्त्व वाटते. म्हणून मी अन्य बाबींवर भाष्य करू इच्छित नाही. शांतता कशी प्रस्थापित होईल, याबाबत मी अधिक आग्रही आहे. अन्य काही देशात घडणाऱ्या गोष्टींसाठी आपल्या राज्यातील लोकांचे जीवन संकटात येईल, असे काही करू नये हे माझे आवाहन असल्याचेही यावेळी हिंदू-मुस्लिम समुदायाला ते म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सर्व देशाच्या निवडणुका एकाच वेळी घेण्याची भूमिका मांडली. नुकत्याच जाहीर झालेल्या पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# निधी वाटपातून महायुतीत वादाची ठिणगी

सत्तेत तीन पक्ष एकत्र आल्याने पुन्हा एकदा निधी वाटप विभागाच्या फाईल्सवरून वाद वाढला आहे. अजित पवार गटाच्या नेत्यांच्या फाईल्स मुख्यमंत्री कार्यालयात अडविण्यात आल्याने अजित दादांनीही मुख्यमंत्र्यांच्या नगरविकास खात्याच्या फाईली वाचल्याशिवाय सही करायची नाही अशी भूमिका घेतली. त्यामुळे निवडणुकीच्या तोंडावर महायुती सरकारमधील अंतर्गत धुसफूस बाहेर आल्याचे दिसते. राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या मंत्र्यांच्या आणि नेत्यांच्या अनेक फाईल्स मुख्यमंत्री कार्यालयात अडवण्यात आल्या आहेत म्हणे. शिवभोजन थाळीचा वाढीव प्रस्ताव आणि यासारख्या १८ ते २० महत्त्वाच्या फाईल्स अडकल्या आहेत. त्यावरून महायुतीत वादाची ठिणगी पडली आहे.

मुख्यमंत्री कार्यालयात फाईल्स अडविल्या जात असल्याने अजित दादांचे मंत्री आणि आमदारांमध्ये नाराजी आहे. मुख्यमंत्री आणि अजित पवार या दोघांनी घेतलेल्या भूमिकेमुळे मंत्रिमंडळ बैठकीत काही मिनिटे तणाव निर्माण झाला. मात्र हा विषय संपल्यानंतर मंत्रिमंडळ बैठक पुन्हा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. आयत्यावेळी विषय आले तर काय करायचे, किमान वाचायला वेळ तरी मिळाला पाहिजे अशी अजित पवारांची भूमिका होती तर तुमच्याकडून आलेल्या फाईलवर मी सह्या करत नाही का असे मुख्यमंत्र्यांचे म्हणणे होते. हा विषय ठरवून आयत्यावेळी आणला नाही तर तो अचानक समोर आल्याने विषय घेतल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. हा वाद सुरू असताना शिवसेनेचे मंत्री तानाजी सावंत अजितदादांवर भडकले. माझ्या विभागाच्या फाईलींवर तुम्ही निर्णय का घेत नाही असा सवाल करत त्यांनी अजितदादांना टार्गेट केले. ही फाईल माझ्या हिताची नसून लोकांच्या हिताची आहे असे सांगत सावंत यांनी नाराजी व्यक्त केली. आगामी विधानसभा निवडणूक तोंडावर आली आहे. त्यामुळे सर्वच लोकप्रतिनिधी आपल्या मतदारसंघात जास्तीत जास्त निधी कसा मिळेल यासाठी धडपड करीत आहेत. सत्तेत तीन पक्ष आहेत. त्यामुळे पुन्हा एकदा निधी वाटप, विभागाच्या फाईल्स यावरून वादाला तोंड फुटले आहे. या आधी महाविकास आघाडी सरकारमध्ये काँग्रेस, राष्ट्रवादी आणि शिवसेना हे तीन पक्ष होते. त्यावेळी अजित पवार निधी देत नाहीत या कारणावरून शिवसेनेचे आमदार बाहेर पडले होते आणि महायुतीचे नवे सरकार स्थापन झाले होते. आघाडी सरकारमध्ये अजित पवार उपमुख्यमंत्री होते आणि वित्त व नियोजन खाते त्यांच्याकडे होते. महायुती सरकारमध्येही अजित पवार उपमुख्यमंत्री आहेत आणि वित्त व नियोजन विभागही त्यांच्याकडेच आहे. मात्र आता परिस्थिती वेगळी आहे. कारण मुख्यमंत्रिपद शिवसेनेकडे आहे. महायुतीतील धुसफुशीवर भाष्य करताना राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील म्हणाले, अजितदादाला तिकडे जाऊन दीड वर्ष लोटजे. अनेक योजना त्यांनी सह्या करून मान्य केल्या. दादांनी अशी भूमिका घेतली म्हणजे यापूर्वीच्या योजना इतरांच्या दबावाखाली मंजूर केल्या का? दादा आता खरे मत व्यक्त करायला लागले आहेत ही चांगली गोष्ट आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अजित पवार यांच्याशी पंगा घेऊन 'फाईल वॉर' सुरू केल्याने शिवसेना-अजित पवार यांच्यातील सत्तासंघर्षाचा दुसरा अंक सुरू झाल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे. महायुतीत तिसरा भिडू आल्याने आधीच नाराज झालेल्या शिंदे गटाने आता बाह्या सरसावल्याचे मानले जात आहे. मंत्रिमंडळ बैठकीत शिंदेंचे मंत्री आणि अजित पवारांचे मंत्री एकमेकांवर मोठ्या आवाजात आरोप-प्रत्यारोप करत असल्याने हा वाद चांगलाच रंगल्याचे सांगितले जाते.

लोकसभा निवडणुकीत राज्यातील महायुतीला जोरदार फटका बसल्याने कोणत्याही परिस्थितीत विधानसभेला घवघवीत यश मिळवायचे, यासाठी शिंदे-फडणवीस-अजित पवार सरकारने चंग बांधला आहे. त्यासाठी नवनवीन योजना आणून विविध घटकांना खुश करण्याचे प्रयत्न सत्ताधाऱ्यांकडून सुरू आहेत. विधानसभा निवडणुकीला काही महिने शिल्लक असतानाच महायुतीत आलबेल नसल्याचे चित्र दिसत आहे. योजनांची घोषणा होण्याआधी अनेक आमदारांच्या आणि मंत्र्यांच्या फाईल्स मुख्यमंत्री कार्यालयात जाऊनही त्याला मंजुरी मिळत नसल्याची खदखद राष्ट्रवादीच्या नेत्यांमध्ये आहे. लोकसभा निवडणुकीत अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला फक्त एक जागा जिंकता आल्यामुळे महायुतीतील जवळपास सर्वच पक्ष त्यांच्यावर नाराज आहेत. त्यातच मुख्यमंत्र्यांकडून अजित पवार गटाची कोंडी केली जात आहे. अजित दादांच्या सहीनंतर फाईलवर फडणवीस आणि मुख्यमंत्र्यांची सही लागते. म्हणजे एकमेकांच्या फाईल अडवून आपली कामे कशी पुढे रेटली जातील असा प्रयत्न केला जात आहे.

---

## सर्वसामान्यांच्या हितासाठी काम करणारा महसूल हा महत्त्वाचा विभाग-पालकमंत्री अतुल सावे

जालना । प्रतिनिधी

**महसूल विभाग शासनाच्या विविध योजना, उपक्रम प्रभावीपणे राबविते. जालना महसूल प्रशासनाने मागील वर्षात व महसूल पंधरवडयात अतिशय उत्तम काम केले आहे. सर्वसामान्यांच्या हितासाठी काम करणारा महसूल हा महत्त्वाचा विभाग आहे. महसूल पंधरवाड्यात शासनाचे विविध उपक्रम यशस्वीपण राबविल्याबद्दल अधिकारी-कर्मचाऱ्यांचे अभिनंदन, असे प्रतिपादन राज्याचे गृहनिर्माण, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे मंत्री तथा जालना जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी केले.**




महसूल पंधरवडा सांगता समारोह जिल्हाधिकारी कार्यालयाच्या महसूल भवनात आज आयोजित करण्यात आला होतो. त्यावेळी पालकमंत्री बोलत होते. कार्यक्रमास जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, जिल्हा पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा मीना, अपर जिल्हाधिकारी रिता मेत्रेवार, निवासी उपजिल्हाधिकारी सोहम वायाळ, उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, नम्रता चाटे, मनिषा दांडगे, सरिता सुत्रावे आदींसह महसूल विभागाचे सर्व अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. पालकमंत्री श्री. सावे म्हणाले की, महसूल दिन दरवर्षी १ ऑगस्टला साजरा केला जातो. यानिमित्ताने शासनाने सर्वसामान्य जनतेला महसूल विभागाच्या माध्यमातून विविध सेवांचा लाभ मिळावा म्हणून या वर्षी महसूल पंधरवडा साजरा करण्याचा निर्णय घेतला. या पंधरवाड्यात जालना महसूल विभागाने अतिशय छान काम केले. या काळात शासनाच्या महत्त्वाकांक्षी योजना जसे मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना, मुख्यमंत्री वयोश्री योजना, मुख्यमंत्री अन्नपुर्णा योजना घराघरात पोहोचविल्या. अनेक उपक्रम यशस्वीपणे राबविले. सर्वच अधिकारी-कर्मचाऱ्यांनी समन्वय व एकजुटीने काम केले. याबद्दल आपले अभिनंदन. तसेच अनेक आव्हानात्मक काम करत असताना महसूल विभागाला पोलीस प्रशासनाचीही नेहमीच चांगली साथ मिळते. याबद्दल पोलीस प्रशासनाचेही अभिनंदन. यापुढेही या विभागांनी उत्तम काम करत राहावे व जनतेला तत्परतेन चांगली सेवा द्यावी. जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ म्हणाले की, महसूल विभाग हा प्रशासनाचा कणा आहे. या विभागामार्फत जनतेला अनेक सेवा दिल्या जातात. वर्षभरात या विभागाने शासनाच्या महत्त्वाकांक्षी योजना, उपक्रम यशस्वीपणे राबविले. महसूल पंधरवाड्यात जिल्ह्यात शिबीर व मोहिमेच्या माध्यमातून लोकोपयोगी उपक्रम राबविण्यात आले. मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेची जिल्हयात यशस्वीपण अंमलबजावणी करण्यात आली आहे. इतर योजनाही प्रभावीपणे राबविण्यात महसूल विभाग आघाडीवर आहे. वर्षभरात अनेक आव्हानांवरही यशस्वीपणे मात करण्यात आली. सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांमध्ये चांगला समन्वय व कामाची प्रति सकारात्मक भाव असल्यामुळे कामे जलदगतीने करण्यात आली. भविष्यातही महसूल विभाग अधिकपणे चांगले काम करीत राहील. मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा मीना म्हणाल्या की, सर्व विभागाशी समन्वयाने काम करणारा महसूल हा अत्यंत महत्त्वाचा विभाग आहे. या विभागाच्या माध्यमातून अनेक लोकोपयोगी कामे केली जातात. इतर विभागांनाही सहकार्य करणारा हा महत्त्वपूर्ण विभाग आहे. प्रास्ताविकात निवासी उपजिल्हाधिकारी श्री. वायाळ यांनी महसूल पंधरवड्यात आणि वर्षभरात महसूल विभागाने केलेली लोकोपयोगी कामांची माहिती दिली. जनतेच्या सेवेसाठी अहोरात्र झटणारा महसूल हा प्रशासनाचा महत्त्वाचा विभाग आहे. शासनाच्या अनेक महत्त्वपूर्ण योजनांची या विभागाचे अधिकारी-कर्मचारी यशस्वीपणे अमंलबजवणी करतात, असे त्यांनी सांगितले.

## रोहन गलांडे पाटील यांच्या मागणीला आले यश !

केज । प्रतिनिधी



केज तालुक्यातील प्रत्येक ग्रामपंचायत अंतर्गत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना म्हणजेच मनरेगाच्या माध्यमातून खोदलेल्या शेतकऱ्यांचे वयक्तीक लाभार्थ्यांचे सिंचन विहीर खोदण्यासाठीचे ४ लाख रुपये अनुदान व गायगोटा योजनेचे ७८ हजार अशा दोन्ही योजनेचे शासनाकडून निधी मागवून लवकरात लवकर लाभार्थी यांना रक्कम मिळावी व तात्काळ शासनाने द्यावी जर तात्काळ रक्कम देण्यात आली नाही तर केज पंचायत समिती समोर आत्मदहन करणार आहे असा इशारा शासनाला निवेदनाद्वारे अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघ महाराष्ट्र राज्य केज तालुकाध्यक्ष रोहन गलांडे पाटील यांनी दीला होता तरी रोहन गलांडे पाटील यांच्या मागणीने केज तालुक्यातील विहीर लाभार्थी, शेतकरी यांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत झालेल्या विहीरीची रक्कम शासनाने १६/०८/२०२४ रोजी शासनाने शेतकऱ्यांच्या खात्यावर विहीरीची रक्कम जमा करण्यास सुरुवात केली असून केज तालुक्यातील शेतकरी आनंदी झाले आहे तरी रोहन गलांडे पाटील यांनी असे म्हटले आहे आत्मदहन करण्याचा इशारा मागे घेत असुन जर गारगोटा विहीर रक्कम जमा करण्यास अडथळा निर्माण झाला तर दोन कोटी पेक्षा जास्त रक्कम शेतकऱ्यांन खात्यात जमा होईपर्यंत यापुढेही केज तालुक्यातील शेतकऱ्यांनसाठी विहीर,गायगोटे दोन कोटी रक्कम पुर्ण जमा होईपर्यंत केज तालुक्यातील शेतकरयांन साठी मी खंबीर पने उभा राहणार आहे असे रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले आहे.

---

## स्वातंत्र्यदिनी एसटी महामंडळातील २५ वर्ष विना अपघात सेवा देणाऱ्या दोन चालकांचा सपत्नीक सत्कार

परळी । प्रतिनिधी

**एसटी महामंडळ रा.प.बस चे अपघात टाळण्याच्या चालकांच्या प्रयत्नांना प्रोत्साहन मिळावे या दृष्टीने पंचवीस वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त कालावधी विना अपघात सेवा करणाऱ्या चालकांना रोख बक्षीस व सपत्नीक सत्कार करत असते त्या अनुषंगाने बीड विभागामध्ये विना अपघात सेवा देणाऱ्या चालकांचा स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून विभागीय कार्यालय बीड येथे सत्कार आयोजित करण्यात आला होता.**

यावर्षी सलग २५ वर्ष विना अपघात सेवा देणारे परळी आगारातील चालक श्री दिनकर भागुजी चाटे व बीड आगारातील श्री. बबन बाबुराव चव्हाण यांची निवड करण्यात



आली. चालक श्री दिनकर चाटे व बबन चव्हाण यांचा २५ वर्ष विना अपघात सेवा केल्याबद्दल मा.विभाग नियंत्रक मॅडम सौ .धरणी नारायण कांडगिरे व विभागीय वाहतूक अधिकारी श्री राजकुमार दिवटे यांचे हस्ते सन्मानचिन्ह, पंचवीस हजार रुपये चा धनादेश ,साडी चोळी, शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर १५ ऑगस्ट २०२४ रोजी बीड जिल्ह्यातील २५ चालकांना विना अपघात सेवा दिल्याबद्दल बिल्ले देऊन सन्मानित करण्यात आले. यामध्ये १० वर्ष विना अपघात सेवेचे २० चालक, २० वर्ष विना अपघात सेवे चे ४ चालक, तर ३० वर्ष विना अपघात सेवा देणाऱ्या ०१ चालकास सुरक्षित सेवा दिल्याबद्दल बीड जिल्ह्यातील ८ आगारा मध्ये बिल्ले देऊन सन्मानित करण्यात आले.

## पवार साहेबांच्या विचाराचा विधानसभेला आमदार द्या, सिंचनाचे सर्व प्रश्न सोडवू-जयंत पाटील

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची शिवस्वराज्य यात्रा दुपारी ३ वाजता दाखल झाली व तिचा त्या दिवशीच समारोप रोहिदास मंगल कार्यालय मध्ये संपन्न झाला . सदर शिवस्वराज्य यात्रा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील व संसदरत्न खासदार अमोल कोल्हे यांच्या नेतृत्वाखाली निघालेली आहे . सदर शिवस्वराज्य यात्रा पाटोदा येथे आली असता समारोप सभेच्या अध्यक्षस्थानी बीड जिल्हयाचे खासदार आदरणीय बजरंगबप्पा सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच प्रदेश युवक अध्यक्ष मेहबूब शेख यांच्या उपस्थितीत पार पडली . याप्रसंगी आदरणीय जयंत पाटील साहेब यांनी त्यांच्या भाषणामध्ये आष्टी , पाटोदा , शिरूर मतदार संघाचा आमदार हा आदरणीय पवार साहेबांच्या विचारांचा व पक्षाचा निवडून दिल्यास व महाविकास आघाडीची सत्ता राज्यात



आल्यास प्राधान्यांनी या मतदारसंघातील सिंचनाचा प्रश्न मार्गी लावू विमानतळासाठी बजरंग सोनवणे यांनी केलेली मागणी केंद्र सरकार बरोबर किंवा राज्य सरकार तर्फे देखील करण्याचा प्रयत्न करू असे आश्वासित केले . तसेच माननीय अमोल कोल्हे साहेबांनी शिवस्वराज्य यात्रा का आली , कशासाठी व हे सरकार बदलने का गरजेचे आहे याविषयी मार्गदर्शन केले याप्रसंगी शेख मेहबूब यांनी गद्दाराला थारा न देता पवार साहेब जो व्यक्ती देतील त्याचा एकदिलाने प्रचार करून निवडून आणण्याचे आवाहन केले . याप्रसंगी अनेक मान्यवरानी त्यांचे विचार मांडले यामध्ये सुशीलाताई मोराळे , राम खाडे , अमोल कोल्हे , ॲड . नरसिंह जाधव , महेश थोरवे , राजाभाऊ दरेकर , शेख नदीम यांनी आपले विचार मांडले या प्रसंगी माजी आमदार दरेकर नाना , माजी आमदार उषाताई दराडे , सुनील गव्हाणे , पूजाताई मोरे , हेमा पिंपळे , अण्णासाहेब चौधरी , परमेश्वर काका शेळके , दीपक खोले , गुलाबभाऊ घुमरे , विष्णुपंत घोलप , पेंटर इक्बाल साहेब , गणेश कवडे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्व आष्टी पाटोदा शिरूर मतदारसंघातील सर्व सेल व पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते सदर कार्यक्रमाचे प्रस्ताविक राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष पक्षाचे तालुका अध्यक्ष शिवभूषण जाधव यांनी केले तर सूत्रसंचालन ॲड . सय्यद यांनी केले

---

# माजी विभागीय आयुक्त विधानसभा निवडणूक लढवणार

जालना । प्रतिनिधी

घनसावंगी विधानसभा निवडणूक माजी विभागीय आयुक्त मधुकर राजे अर्दड उमेदवार म्हणून निवडणूक लढणार असल्याची माहिती जालना येथे माता श्री लॉन्स येथे पत्रकार परिषद मध्ये माहिती दिली असल्याची घोषणा माजी विभागीय आयुक्त मधुकरराजे अर्दड यांनी केली.

घनसावंगी मतदारसंघातील जनता मूलभूत विकासापासून वंचित आहे. मतदारसंघात विविध समस्यांनी जनता त्रस्त असून प्रस्थापित लोकप्रतिनिधी विरोधात लोकांमध्ये असंतोष / रोष / नाराजी आहे. या मतदारसंघातील अनेक मतदार बंधु भगिनींनी, परिचीत अनेकांनी श्री. मधुकर अर्दड हे विभागीय आयुक्त असतांना त्यांनी केलेले कार्य पाहून राजकारणात यावे असा आग्रह धरला. त्यामुळेच आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने याविषयीची भूमिका सविस्तरपणे घनसावंगी विधानसभेतील मतदारांसमोर मांडण्यासाठी श्री. मधुकर अर्दड यांच्या वतीने दिनांक १७ ऑगस्ट २०२४ रोजी पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्यांनी मतदारसंघातील विविध प्रश्नांवर भाष्य केले. बारसवाडा येथील गल्हाटी प्रकल्पातील पाणी साठवण्याचा प्रश्न उपस्थित करत घनसावंगीत एमआयडिसी सूरु झाली नसल्याबद्दल ही खेद व्यक्त केला. संपूर्ण मतदारसंघात दिनांक १९ ऑगस्ट पासून 'जनसंवाद यात्रा' काढणार असल्याचे सांगत वर्षानुवर्षे खोटी आश्वासने देणाऱ्याना थारा देऊ नये. मी जेव्हा विभागीय आयुक्त म्हणून कार्यरत असतांना घनसावंगी विधानसभा मतदारसंघातील अनेक लोक, परिचीत अनेक समस्या, अडचणी घेऊन माझ्याकडे यायचे. मुबलक नैसर्गिक साधनसंपत्ती असूनही मूलभूत समस्यांची वानवा इथे लोकांना भेडसावते. यावर शाश्वत उपाय अजूनही कोणी लोकप्रतिनिधी देऊ शकला नाही. जनतेच्या अडचणी सोडवत असतांना अनेक पातळींवर काम केले. तळागाळातील जनतेच्या कल्याणासाठी काम करण्याची संधी मला माझ्या सांविधानिक पदाच्या माध्यमातून मिळाली हे मी माझे भाग्य समजतो. मी जेव्हा राजेटाकळी हे माझ गाव सोडल त्यानंतर शिक्षण, नोकरी, प्रशासकीय सेवा व त्यानंतर



विभागीय आयुक्त पदावरून सेवानिवृत्ती इथपर्यंतचा प्रवास मी केला. ज्या वेळी मी गाव सोडल त्यावेळी मतदारसंघात जे प्रश्न, ज्या समस्या होत्या तेच प्रश्न, त्याच समस्या आजही कायम आहेत. या सगळ्याला जबाबदार कोण? या समस्यांचे उत्तर काय ? आणि या समस्या सुटतील कशा? यावर आता विचार करायची गरज आहे. लोकांच्या मनातले अनेक प्रश्न घनसावंगी मतदारसंघातले मूलभूत विकासाचे अनेक प्रश्न न सोडवल्याने मतदारसंघात किती मोठ्या प्रमाणात प्रस्थापित लोकप्रतिनिधीविरोधात रोष आहे व त्यांना जगण्यासाठी किती संघर्ष करावा लागतो आहे. 'उच्चतंत्रशिक्षण मंत्रिपद' मिळूनही 'आरोग्यमंत्रीपद' मिळूनही मतदारसंघात ना चांगल्या शिक्षणाच्या सुविधा आहेत ना आरोग्य केंद्रांची स्थिती चांगली आहे. बारसवाडा येथील गल्हाटी प्रकल्पात पाणी साठवण्याचा प्रश्न असो, घनसावंगीतील एमआयडीसीचा प्रश्न असो रस्त्यांची दुर्दशा असो वा जायकवाडी लाभ क्षेत्रातील जमिनींचे प्रश्न असो अश्या अनेक प्रश्ना बाबतीत मतदारसंघात असंतोष आहे. बेरोजगारीचा प्रश्न भीषण आहे. हाताला काम नसल्यामुळे मोठ्या प्रमाणात तरुणाई व्यसनाधीन होऊन चुकीच्या मार्गावर जात आहे. एक ना अनेक प्रश्नांनी मतदारसंघातील मतदार त्रस्त आहे. त्यामुळे माझ्या मतदारसंघातील तळागाळातील सर्वच मतदारांना सर्वोत्तम, दर्जेदार सेवा, सुविधा मिळाव्या यासाठी आता विभागीय आयुक्त या पदावरून सेवानिवृत्त झाल्यानंतर सक्रिय राजकारणात येत माझ्या मतदारसंघातल्या जनतेची सेवा माझ्या हातून घडावी असा माझ्या कार्यकर्त्यांचा आग्रह आहे. आणि कार्यकर्त्यांचा हाच आग्रह तसेच लोकांच्या वेदना, प्रश्न मला राजकारणात सक्रिय भूमिका घ्यायला भाग पाडतो. आणि म्हणूनच मी घनसावंगी मतदारसंघातून माझी उमेदवारी जाहीर करत आहे. कोणत्या पक्षाकडून असेल? की अपक्ष असेल याविषयी सविस्तर निर्णय मी १९ ऑगस्ट पासून संपूर्ण मतदारसंघात निघणाऱ्या ''जनसंवाद यात्रेनंतर'' घेईल. यात्रेदरम्यान सर्वसामान्य मतदारांशी चर्चा करून त्यांच दुख समजून घेऊन तसेच त्यांची मते विचारात घेऊन मी माझा निर्णय जाहीर करेल. मात्र मी निवडणूक लढवणार आहे आणि तसेच प्रचंड बहुमतांनी ती घनसावंगीवासीयांच्या आशीर्वादाने जिंकणार सुद्धा तसे बघायला गेले तर मतदारसंघ हा मुबलक नैसर्गिक साधनसंपत्तीने परिपूर्ण आहे. मुबलक पाणी, जमिनीची उत्पादकता, लोकांची प्रयोगशीलता, विचारसरणी विशेष आहे. येथे ॲग्रो इंडस्ट्रीज, फळप्रक्रिया उद्योग, मधुमक्षिका पालन, डेअरी उद्योग, रेशीम शेती- प्रक्रिया उद्योग असे अनेक उद्योग व यातून अनेक रोजगार सहज उपलब्ध होऊ शकतात. पण त्यासाठी येथील लोकांना- शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत, योग्य मार्गदर्शन देणे त्यांना अशा मूलभूत प्रश्नासाठी एकत्र आणणे गरजेचे आहे. येथे पर्यटनाच्या दृष्टीने देखील अनेक धार्मिक स्थळ आहेत सरकारच्या मदतीने त्यांचा विकास / जीर्णोद्धार केला तर त्यातून अनेक रोजगार निर्मितीचे साधने मतदार संघात निर्माण होतील. येथे गोदाकाठी अनेक वर्षांपासूनचे हेमाडपंथी प्राचीन शिव मंदिरे आहेत ते आपण शिव कॉरीडॉर म्हणून उदयासागू शकतो. प्रसिद्ध असे जांब समर्थ हे समर्थ रामदास स्वामींचे जन्मठिकाण थोडक्यात पश्चिम महाराष्ट्रापेक्षा अधिक विकसित होऊ शकेल इतके आपल्या घनसावंगी मतदारसंघात असूनसुद्धा मागास राहिलेल्या या मतदारसंघाच चित्र बदलण्यासाठी विकासाच नवीन गरजेच आहे. जे मी यात्रेनंतर सविस्तरपणे मांडेल. ज्यात लोकांच्या समस्येच शाश्वत उत्तर असेल. आपणही घनसावंगी मतदारसंघाला विकसित मतदारसंघ घडवण्याच्या या शुभकार्यात आवश्यक ते सहकार्य करावे, ही अपेक्षा धरत आपल्या माध्यमातून मतदारांना आवाहन आहे की येणाऱ्या निवडणुकीत तुमचे प्रश्न सोडवू शकण्याची समज, क्षमता व जाण नसणाऱ्या, वर्षानुवर्ष तुम्हाला भुलवणाऱ्यांना, तीच तीच खोटी आश्वासणे देणाऱ्यांना थारा देऊ नये असेही शेवट यावेळी पत्रकार परिषद मध्ये श्री अर्दड म्हणाले

---

## पान १वरून...

### लाडक्या बहिणीचा इम्पॅक्ट;

काय असेल, असा प्रश्न सर्वांनाच पडला आहे. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांचा पहिला एआय सर्व्हे समोर आला आहे. लोकसभा निवडणुकांमधून महाराष्ट्रातील जनतेच्या मनातील कौल दिसून आला आहे. त्यामुळे, महाविकास आघाडी आजच निवडणुकांसाठी तयार असल्याचे सांगत असून स्वत: उद्धव ठाकरेंनी महाविकास आघाडीच्या मेळाव्यात आजच निवडणुकांची घोषणा करा, आम्ही तयार आहोत असे म्हटले. मात्र, एआयच्या सर्वेक्षणानुसार महाराष्ट्रतील निवडणुकांसाठी आज मतदान झाल्यास नेमकं चित्र काय असेल, याचा अंदाज घेण्याचा प्रयत्न केला आहे. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकींत लाडकी बहीण योजना गेमचेंजर ठरू शकते का, मुख्यमंत्रीपदासाठी मराठी माणसांची कोणाला पसंती आहे? राज्यात कोणाचे सरकार स्थापन होईल? या प्रश्नांची उत्तरे जिनिया एआय सर्वेक्षणातून समोर आली आहेत. एआय सर्वेक्षणातून राज्यातील लाखो लोकांची मतं जाणून घेण्यात आली आहेत. एआय या अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने हा सर्वे करण्यात आला असून ४७ टक्के लोकांनी भाजप नेतृत्त्वातील महायुतीला फायदा होईल, असा कौल दिला आहे. त्यामुळे लाडक्या बहिणींचा यातून इम्पॅक्ट दिसून येत असून महायुतीच सरकार बनवेल, असे यावरुन दिसते. सर्वाधिक पसंतीही त्यांनाच मिळत असून महाविकास आघाडीची पिछेहाट होताना दिसत आहे.

----------

### तुम्ही आम्हाला बळ द्या, आम्ही

देऊ, अशी घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली. त्यामुळे महिलांसाठी ही दुसरी आनंदाची बाब आहे. शिंदे म्हणाले, कॅबिनेटमध्ये मी सांगितले होते की रक्षा बंधनाच्या आधी हे पैसे पोहोचले पाहिजे. खातं चालतं की नाही हे बघायचे होते. त्यामुळे एक रुपया टाकायचा सल्ला काहींनी दिला. पण अजितदादा व फडणवीस यांनी सांगितले तीन हजार टाका आणि ट्रायल रन घ्या. लाडक्या बहिणी सांगत असतात खात्यात पैसे आले. तेव्हापासून राखी बांधायचा कार्यक्रम सुरू झाला. बहिणींच्या आयुष्यातील हा आनंदाचा दिवस आहे. हा आनंद साजरा करण्यासाठी नारी शक्ती आल्या आहेत. मी बहिणींशी संवाद साधून स्वातंत्र्य दिन साजरा केला. अनेक बहिणींनी भावना व्यक्त केल्या. आम्हाला आधार मिळाला म्हणाल्या. त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद व्यक्त केला, असे ते म्हणाले.

--------------------

### अजित पवारांच्या पक्षात

व्यवहारांबाबत बोलताना म्हणाल्या की, आम्ही प्रत्येक गोष्टीला पैसे भरतो. प्रत्येक गोष्टीचा हिशोब आहे. डिजिटलद्वारे आम्ही पैशांचे व्यवहार करतो. ६५ देशांची यादी आहे ज्या ठिकाणी मी गेली आहे. माझ्याकडे सर्व राजकीय नेत्यांचे डिटेल्स आहेत. नागरिकांनी समजून घ्यावे हे बरोबर का तो बरोबर आहे. कोणी दादा ताई बरोबर नाही हे सर्व महाराष्ट्र लुटायला आल्याची टीका अंजली दमानिया यांनी केली. अजितदादा यांच्यासह सर्वांची चौकशी करावी. नाना पटोलेंसारखा माणूस पाच लाख रुपये इन्कम दाखवतो. उद्धव ठाकरे एक-दोन हे खरं वाटेल का? अशी विचारणा सुद्धा त्यांनी केली, असेही त्या म्हणाल्या.

-------------

### पोलिस अधिकाऱ्यांच्या बदल्या

सपोनि नितीन गुट्टावार यांची परळी शहर, नियंत्रण कक्षातून सोमनाथ जाधव यांना आष्टी, आर्थिक गुन्हे शाखेतून पोलिस निरीक्षक राहूल सुर्यतळ यांची माजलगाव शहर ठाण्याला बदली करण्यात आली आहे. आष्टी तालुक्यात दरोडे, चोऱ्यांचे प्रमाण अधिक असल्याने पोनि सोमनाथ जाधव यांच्या समोर मोठे आव्हान असणार आहे.

---------

### राजकारणात सत्तेत असो वा नसो परंतु

काय आहे ही लक्षात येईल.सध्या मतदार संघात ज्याची ग्रामपंचायतला निवडून यायची लायकी नाही तो विधानसभा लढविन्याचे स्वप्न पाहत आहे. ३३ वर्षाच्या राजकारणात माणसं कमावली ती टिकवली म्हणून त्यांच्या एक निष्टतेला माझा सलाम असल्याचे मत व्यक्त करताना आगामी विधानसभा निवडणुकीच्या कामाला लागण्याचे आवाहन देखील धस यांनी शेवटी केले. यावेळी पारगाव जोगेश्वरी मेळाव्यात सभापती बद्रीनाथ जगताप म्हणाले की विद्यमानाने ज्याच्या जीवावर आज हे दिवस बघितले त्यांच्यावर दंड थोपटण्यापेक्षा आमच्यावर दंड थोपटा तसेच माजी मंत्री सुरेश आण्णा धस हे आष्टी मतदार संघाला लाभलेले एक मोठा नेतृत्व आहे ज्यांनी तळागाळातल्या लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्व समाज घटकाला बरोबर घेऊन आपली राजकीय वाटचाल चालू ठेवली आहे अशा नेतृत्वाला पुन्हा एकदा आपल्याला आता बीड जिल्ह्यामध्ये सर्वाधिक मताधिक्याने आमदार करायचे आहे सर्व कार्यकर्त्यांनी आपले मतभेद विसरून आजपासून कामाला लागावी असेही आव्हान सभापती बद्रीनाथ जगताप यांनी केले,माजी जि.प.सदस्य नवनाथ चखाले,गणेश शिंदे,माजी सभापती दत्ताभाऊ जेवे, ह.भ.प.अशोक महाराज भोसले, माजी सरपंच चेअरमन गणेश मोकाशे,अँड.बाळासाहेब झांबरे,सरपंच संदिप खेडकर, सरपंच पोपट शिरोळे, सरपंच शांतीलाल काटे, पांडुरंग कुमकर,शकीलभाई कुरेशी, शिवाजी आवारे,चंद्रकांत भोसले,वसंत भोसले,आजिनाथ भोसले,वजिर भाई पठान, सुरेश सातपुते, संजय जेवे, ललीत जेधे -विष्णु खाडे, संभाजी कोकणे, शिवाजी आवारे - सखाराम बळे, माजी सरपंच निळकंठ खेडकर,तात्यासाहेब बळे, मा.सरपंच भाऊसाहेब सुरवसे, अशोक राऊत, धनश्याम खाडे, बाळासाहेब मोकासे बापू, बाळासाहेब खेडकर आवारे साहेब, सूर्यकांत मोकासे, बाबु बोराडे,बारकू टेलर तर आष्टी शहर व मुर्शदपुर गण या मेळाव्यात व्यासपीठावर नगराध्यक्ष जिया बेग,माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे,माजी सरपंच बन्सी भाऊ पोकळे, चेअरमन शांतीलाल भोसले,रमेश पवळे,खंडू दादा जाधव,बळे काका,दीपक निकाळजे, राहुल मुथ्था,टाटा शेठ धामणगाव गणातील मेळाव्यास माजी सभापती शत्रुघ्न मरकड,माजी चेअरमन संजय गाढवे,सरपंच मनोज गाढवे,सरपंच दत्तात्रय खोटे,सरपंच नंदकिशोर करांडे,सरपंच विनायक मुळीक,उपसरपंच डॉ.अकिल सय्यद,सरपंच खंडू हाके,सरपंच संजय महाजन ,नामदेव काकडे,माजी उद्धव बेद्रे, बाबू भैय्या गर्जे,डॉ.बाबासाहेब आंबेडकर सोशल फोरमचे तालुकाध्यक्ष गेनबा साळवे,सदाशिव घुमरे,रवी वायकर,नारायण वणवे,धनंजय तरटे,दादासाहेब वनवे,गोवर्धन तळेकर, निलेश पोकळे यांच्यासह प्रत्येक गणातील प्रमुख कार्यकर्ते, पदाधिकारी,नागरिक,महिला भगिनी, युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. एकंदरीत आमदार सुरेश धस यांच्या दांडगा संपर्क व मोठी कार्यकर्त्यांची फळी गावागावात उभी असल्याने आज मतदार संघामध्ये जनसंपर्क संवाद यात्रा करत असताना प्रत्येक गणामध्ये हजारोच्यासंख्येने कार्यकर्ते जमत आहेत तसेच एकंदरीत माजी मंत्री सुरेश आण्णा धस यांनी १९९९ सारी जी विधानसभा पहिली विधानसभा जिंकली त्यावेळी चे वातावरण होते तेच वातावरण आता पुन्हा २०२४ च्या निवडणुकीत दिसून येत आहे.

-------------

### महाराष्ट्राची निवडणूक जाहीर होत

जम्मू काश्मीर आणि हरयाणा राज्याच्या निवडणुकांच्या तारखांची घोषणा झाल्या, मात्र महाराष्ट्राची निवडणूक अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही. पंतप्रधानांचा महाराष्ट्राबद्दलचा निर्णय हा विरोधाभासात्मक आहे आणि याबद्दल अधिक स्पष्टीकरण अपेक्षित असल्याची भूमिका स्पष्ट करत महाराष्ट्रातील निवडणुकांचे वेळापत्रक स्पष्ट झाल्याशिवाय, पंतप्रधानांच्या घोषणेला योग्य प्रतिसाद देणे कठीण होईल, असा उपरोधिक टालाही यावेळी त्यांनी लगावला.

------------

## टी.सी.हरवला आहे.

मनिषा नारायण उगले या विद्यार्थिनीचा बारावी पासचा टी.सी. बीड -हाजीपूर एसटी प्रवासादरम्यान हरवला आहे. ज्या कोणास सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क करा.

:::::: **संपर्क** :::::

**मनिषा नारायण उगले,मो.९४२००२८७३२**

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

रविवार दि. १८ ऑगस्ट २०२४



## खोलेश्वर विद्यालय दिंद्रुड येथे स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील खोलेश्वर विद्यालय येथे जि प माझी मुख्यध्यापक सूर्यकांत अंबुरे सर, खोलेश्वर विद्यालयाचे सचिव विलासराव पारेकर साहेब, खोलेश्वर विद्यालयाचे मुख्याध्यापक संजय रायते सर,यांनी प्रतिमा पूजन व ध्वजारोहण केले, यावेळी



प्राचार्या सरिता फपाळ मॅडम, सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, खोलेश्वर मल्टीस्टेटचे सर्व कर्मचारी, सुजाण पालक व दिंद्रुड नगरीतील प्रतिष्ठीत नागरिक उपस्थित होते.स्वातंत्र्य दिनानिमित्त अनेक विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले ,देशभक्तीपर गीते गायली तर काही विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतांवर नृत्या सादर केले.

# डॉ.दिपाताई क्षीरसागरांनी लोककलेची जोपासना केली : निलम शिर्के सामंत

## बीडमध्ये 'जल्लोष लोककले'चा महोत्सवाचे उद्घाटन; शेकडो बाल कलावंतांचा सहभाग

**बीड । प्रतिनिधी**

मागच्या पिढीतील कलागुण पुढच्या पिढीमध्ये बालकलाकारांच्या रूपाने रूजवले जातात आणि हेच काम बीड जिल्ह्यात अगदी जोमाने सुरू आहे. हा जिल्हा लोककलेची जोपासना करणारा आहे, याचा मला मनस्वी आनंद होत आहे. बालरंगभूमी परिषदेची बीड शाखा लोककला जोपासण्यामध्ये अग्रणी आहे. बीड बालरंगभूमीच्या अध्यक्ष डॉ.दिपाताई क्षीरसागर यांच्या नेतृत्वात बालकांमध्ये लोककला जोपासली जातेय, हे अवघ्या महाराष्ट्राच्या दृष्टीने दिशादर्शक काम आहे, असे प्रतिपादन बालरंगभूमीच्या राज्याध्यक्ष तथा अभिनेत्री निलम शिर्के सामंत यांनी केले.

शहरातील सौ.के.एस.के. महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात बालरंगभूमी परिषदेच्यावतीने आयोजित 'जल्लोष लोककलेचा' या महोत्सवाचे शनिवारी (दि.१७) उद्घाटन झाले. उद्घाटक म्हणून निलम शिर्के सामंत या बोलत होत्याा.

व्यासपीठावर बालरंगभूमी परिषदेच्या उपाध्यक्ष तथा बीड शाखा अध्यक्ष प्राचार्य डॉ.दिपाताई क्षीरसागर, बालरंगभूमीचे





कार्यवाह सतिश लोटके, कार्यकारिणी सदस्य आनंद जोशी, स्नेहल पाठक आदींची उपस्थिति होती.

पुढे बोलताना निलम शिर्के सामंत म्हणाल्या की, महाराष्ट्रातील २० जिल्ह्यात बालरंगभूमीचे काम जोमाने चालू आहे. त्याची सुरूवात जिल्ह्यातून आज होत आहे. जिल्हा लोककलेचे माहेरघर आहे असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. लोककलेची उत्तुंग परंपरा जोपासण्याचे काम या जिल्ह्यात केले जाते. लोककलेची बालकलाकारांमध्ये ओळख, आवड निर्माण करणे ही काळाची गरज आहे, असे मत व्यक्त केले. स्पर्धेच्या परिक्षणासाठी जयंत शेवतेकर, डॉ.वैजिनाथ राठोड, अभिजीत भातलवंडे, शाहीर संतोष सांळूके, धम्मपाल सपकाळ, डॉ.ज्ञानेश्वर सोनवणे यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक डॉ.दिपाताई क्षीरसागर यांनी केले. सूत्रसंचालन डॉ.संजय पाटील देवळाणकर यांनी केले. आभार शाहीर विलास सोनवणे यांनी मानले.

### दिंडीने सुरुवात; दीडशे संघ सहभागी

सुरूवातीला बालकलावंताची लोकदिंडी काढण्यात आली. यात सर्वशाळेचे संघ विविध वेशभूषेत सहभागी झाले होते. तसेच, लोकनृत्या, समूह लोकनृत्या, लोकगीत, लोकवाद्य यासाठी जवळपास १५० संघानी सहभाग नोंदवला आहे. दिवसभर या कलांचे सादरीकरण चालले. दरम्यान, दिंडीसह महोत्सव यशस्वी करण्यासाठी दुष्यंता रामटेके, दिपक जमधाडे, नितीन प्रधान, मिलींद शिवणीकर, सुरेश साळूंके, सिध्दार्थ अग्रवाल, नामदेव साळूंके, सुरेश थोरात, रोहित पुराणिक, अमित गाडे आदी पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

### निलम शिर्के सामंत यांच्यामुळे कला क्षेत्रात ऊर्जा संचारली : डॉ.दिपाताई क्षीरसागर

प्रास्ताविकात डॉ.दिपाताई क्षीरसागर म्हणाल्या की, निलम शिर्के सामंत या बालरंगभूमी परिषदेला अध्यक्ष लाभल्यापासून बालकला क्षेत्रात ऊर्जा संचारली आहे. आम्हाला बालरंगभूमीचे कार्य करण्यासाठी मोलाचे पाठबळ मिळत आहे. आम्ही मागील आठवड्यात बालरंगभूमी परिषदेच्यावतीने छत्री रंगवा हा बाल कलाकारांसाठी उपक्रम राबवला. त्याास शंभरहून अधिक स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. बालकांमध्ये असलेल्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी बालरंगभूमी हे व्यासपीठ फार उपयोगी पडत आहे. आजचे बालक हे उद्याचे उत्तुंग यश गाठणारे कलाकार होणार आहेत. त्याासाठी आपणास हे काम जाणीवपूर्वक केले पाहिजे. बालकलांकारामध्ये प्रचंड उर्जा आणि कला लपलेली आहे. त्याांना व्यासपीठ देऊन व तशी संधी देऊन त्याा कलांचा उत्कर्ष करण्याचे काम बालरंगभूमी परिषद बीड शाखा करत आहे. याचा मला खूप आनंद आहे, असे त्याा म्हणाल्या.

## बुखारी उर्दु शाळेत उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले यांच्या हस्ते ध्वजारोहण





**माजलगाव । प्रतिनिधी**

स्वातंत्र्या दिवसाच्या निमित्ताने दिनांक १५ ऑगस्ट गुरुवार रोजी येथील बुखारी एज्युकेशनल सोसायटी माजलगाव येथे माजलगावचे उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.यावेळी बुखारी एज्युकेशनल सोसायटीचे सचिव अल्हाज खुर्शीद नाईक,सहसचिव इम्रान नाईक, सदस्य शेख समीर अ.गफ्फार,शेख जब्बार अ.रज्जाक,मुख्यध्यपक शेख हारून बाशिरोद्दिन,शेख नविद शरीफ,शिक्षक वृंद, कर्मचारी व पालक वर्ग उपस्थीत होते.

## सेवानिवृत्त एस.टी. कामगारांच्या बैठकीचे अंबाजोगाई येथे १८ ऑगस्ट रोजी आयोजन–परमेश्वर करपे

अंबाजोगाई । प्रतिनिधी

एस.टी.सेवानिवृत्त कर्मचारी संघटना बीड विभागाच्या वतीने अंबाजोगाई येथे रविवार, दिनांक १८ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता अंबाजोगाई बस स्थानकाचे समोर मराठवाडा सांस्कृतिक मंडळाचे (पब्लिक क्लब) चे सभागृहात महत्वाची मिटिंग आयोजित करण्यात आलेली आहे. ही बैठक बीड विभागाची असल्याने सदर बैठकीस बीड, गेवराई, पाटोदा, आष्टी, धारूर, माजलगाव व परळी येथील एस.टी.सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. तरी सभासदांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असे आवाहन राज्य परिवहन निवृत्त कर्मचारी संघटनेचे बीड विभाग शाखा अंबाजोगाईचे उपाध्यक्ष परमेश्वर करपे यांनी केले आहे.

या बैठकीत एस.टी.चे कार्यकारी संचालक (एम.डी. साहेब) मुंबई यांचे समवेत दिनांक २ जुलै २०२४ रोजी संघटनेच्या झालेल्या बैठकीची माहिती, सेवानिवृत्त तसेच सेवानिवृत्तीचे पतीस द्यावयाचे पासेस, विभाग नियंत्रक बीड यांचे समवेत घ्यावयाच्या बैठकीतील मुद्यांबाबत माहिती देण्यात येईल. सेवानिवृत्त होवूनही त्याांची पेन्शन प्रलंबीत असलेली प्रकरणे व त्याबाबत करावयाची कार्यवाही, हायर पेन्शन, तसेच किमान पेन्शन वाढीबाबत आंदोलनाची माहिती व पुढील कार्यवाही याबाबत चर्चा व माहिती देण्यात येणार आहे. सदर बैठकीस इपीएस–९५ सेवानिवृत्तांचे प्रश्नांची इत्यांभूत माहिती असलेले व इपीएस–९५ कामागारांचे राष्ट्रीय पातळीवर नेतृत्व करणारे अभ्यासू प्रा.के.एन.अंबाड (लातूर) हे प्रमुख पाहुणे म्हणुन हजर राहणार आहेत. त्याांचे सविस्तर मार्गदर्शन व माहिती इपीएस–९५ चे सेवानिवृत्तांना मिळणार आहे. तरी या बैठकीसाठी एस.टी.सेवानिवृत्त कामगार व इपीएस–९५ सेवानिवृत्तांनी वेळेवर हजर रहावे अशी विनंती अंबाजोगाई शाखा संघटनेचे उपाध्यक्ष परमेश्वर करपे, अंकुशराव दाभाडे, नंदी कोल्हे, सोनेराव तसेच बीड विभागाचे अध्यक्ष तथा प्रादेशिक अध्यक्ष हेमंत कुलकर्णी बीड विभागाचे सचिव रमेश महामुनी, केंद्रीय कार्यकारीणीचे संघटक प्रभाकरराव आंबेकर, विभागाचे कार्याध्यक्ष शेख सत्तार, कामगार नेते अशोक गावडे, तसेच पाटलोबा नागरगोजे (परळी), भिलारे त्त्याााा (माजलगाव), बी.एस.कुंभार (धारूर), शेख बाबु (पाटोदा), कोषाध्यक्ष कुलकर्णी आदींनी आवाहन केले आहे.

## राज्यातील पहिल्या वस्तीगृहाचे मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते उद्घाटन

जालना । प्रतिनिधी

राज्य शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्यावतीने राज्यात ७२ वस्तीगृहांची उभारणी करण्यात येणार आहे. त्याचाच भाग म्हणून स्वातंत्र्या दिनाचे औचित्या साधत गृहनिर्माण आणि इतर मागास बहुजन कल्याण मंत्री तथा जालना जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते पहिल्या वस्तीगृहाचे जालना येथे उद्घाटन करण्यात आले.

ग्रामीण भागातील मुला–मुलींची शहरात शिक्षण घेत असताना राहण्याची अडचण निर्माण होवू नये यासाठी राज्य सरकारच्या वतीने राज्यातील ३६ जिल्ह्यात प्रत्योकी २ वस्तीगृह तयार करण्यात येत आहे. यात





१०० मुले आणि १०० मुली यांना राहण्यासाठी या वसतिगृहाचे उपयोग होणार आहे. स्वातंत्र्या दिवसाचे औचित्या साधून गुरुवारी जालना येथे पहिल्या वस्तीगृहाचे उद्घाटन पार पडले. ग्रामीण भागातून शहरात शिक्षणासाठी येणाऱ्या मुला मुलींची निवासाची व्यवस्था करण्यात आली असल्याने यामुळे त्याांच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये याचा निश्चितच खूप मोठा उपयोग होईल, असे प्रतिपादन यावेळी मंत्री श्री अतुल सावे यांनी केले.

पुढे बोलतांना मंत्री अतुल सावे म्हणाले की, वस्तीगृहात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्या, विविध भत्ते, ग्रंथालय अशा विविध सुविधा पुरवण्यात येणार आहे. अशा या सर्व सुविधा युक्त असलेल्या या वस्तीगृहात जास्तीजास्त विद्यार्थ्यांनी प्रवेश घ्यावा तसेच ज्यांना प्रवेश मिळणार नाही अशांना सावित्रीबाई फुले आधार योजना आणि स्वयंम योजनेच्या माध्यमातून प्रवेश देण्यासाठी विभागाच्यावतीने प्रयत केले जाणार असल्याचे त्याांनी सांगितले. यावेळी खासदार कल्याण काळे, आमदार कैलास गोरंट्याल, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा मीना, पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल, समाजकल्याणचे प्रादेशिक उपायुक्त जलील शेख यांच्यासह अधिकारी कर्मचारी आणि विद्यार्थी यांची उपस्थिती होती.



माजलगाव:– येथील कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यालयामध्ये स्वातंत्र्यादिनानिमित्त ध्वजारोहण करताना बाजार समितीचे सभापती जयदत्त (अण्णा) नरवडे,समवेत उपसभापती श्रीहरी (नाना) मोरे,संचालक उद्धवराव नाईकनवरे,मनोज त्त्यााा जगताप,भगवान (नाना) आगे,संजयजी कचरे,आबाजी भोसले,प्रभाकरराव होके,जुगलकिशोर नांवदर,अमोल जाधव,नंदकिशोर सजगणे,कदीर पठाण,सचिव हरिभाऊ सवणे यांच्यासह जिल्हा परिषद सदस्य चंद्रकांत शेजुळ,माजी संचालक अनंतराव सोळंके,माजी पंचायत समिती उपसभापती डॉ. वसीम मनसबदार, ख.वि.चेअरमन शेख जमीर अत्तार,माजी प.स. सदस्य मिलिंद लगाडे नवनाथ धाईजे,प्रदीप पट्टेकर व सर्व आडत व्यापारी,हमाल मापाडी व सर्व आजी,माजी कर्मचारी बांधव उपस्थित होते.

## तीर्थक्षेत्र परळी वैजनाथ येथे भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सव उत्साहात

**परळी । प्रतिनिधी**

आद्यवस्त्र निर्माता, शिवपुत्र भगवान जिव्हेश्वर यांचा जन्मोत्सव सोहळा परळी शहरातील संत जगमित्र नागा मंदिर येथे असंख्य समाज बांधवांच्या उपस्थितीत संपन्न झाला. सकाळी सहा वाजता पाळणा आणि आरती होऊन जन्मोत्सव कार्यक्रमाची सुरुवात झाली. भगवान जिव्हेश्वर जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त विविध सामाजिक, धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

दि. १७ ऑगस्ट २०२४, शनिवारी ,श्रावण शुद्ध १३ रोजी शहरातील संत जनित्र नागा मंदिर येथे जन्मोत्सवाच्या निमित्ताने शहरातील समस्त स्वकुळ साळी ( विणकर) बांधव येथे पहाटेच आरती साठी सर्व लहान थोर मंडळी उपस्थित होते. समाज बांधवांच्या वतीने सकाळी सहाच्या सुमारास जन्मोत्सव, आणि प्रातसमयी ८ वाजता प्रभू भगवान श्री जिव्हेश्वरांची शोभायात्राही काढण्यात आली. लहान मुला–मुलींसाठी विविध स्पर्धा, दुपारी महाप्रसाद आयोजित करण्यात आला होता. दहावी –बारावी मध्ये उत्कृष्ट ९०% अधिक गुणसंपादन करणाऱ्या पाल्यांचाही यावेळेस यथोचित गौरव करण्यात आला. दुपारी चार वाजता मुक्ताई महिला भजनी मंडळीचे भजन हे संपन्न झाले. जन्मोत्सव सोहळ्यास शहरातील अनेक मान्यवरांनी भेट दिली. माजी नगराध्यक्ष भैया धर्माधिकारी, प्रदीप राव देशमुख (सदस्य वैद्यनाथ देवल कमिटी) यांच्यासह पत्रकारांनी उपस्थिती लावली आणि आयोजित कार्यक्रमाचे कौतुक केलं. सायंकाळी ६ वा.आरती होऊन जन्मोत्सव सोहळ्याची सांगता करण्यात आली. जन्मोत्सव सोहळ्याचे पौरोहित्या उदय औटी यांनी केलं.



### भगवान जिव्हेश्वर यांच्या भव्य शोभायात्रेने वातावरणात प्रसन्नता

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी स्वकुळ साळी विणकर समाजाचे अध्यक्ष बालासाहेब बडकस, सचिव नितीन भंडारे, विलास ताटे, धनंजय आरबुने, नारायण मानकर, नामदेव आरबुने, ज्ञानोबा घटे,भास्कर कौसलें, गंगाधर इंगळे, विष्णू लिखे, अशोक लिखे, विठ्ठल शिवगण, विष्णू शिवगण, भगवान आरबुने, किरण भंडारे, नागनाथ कल्याणकर, श्रीनिवास लटंगे, सुदर्शन वडकर, प्रभू घटे, नवनाथ पोरे,उमेश मानकर, संदीप बोनगे, दौलत आरबुने,लक्ष्मण लिमकर, पवन आरबुने,अशोक आरबुने, दत्तात्रय बडकस,गणेश पोरे, सचिन पोरे, दीपक मानकर, रामकीशन वीर,उमेश मानकर, मयूर आरबुने,किसन कांबळे,दीपक आरबुने, तर महिला मंडळाच्या स्वाती ताटे, मंजुषा पोरे, सुरेखा आरबुने, वैजयंती इंगळे, अनुराधा कौसाले, श्रीमती सीताबाई भंडारे, रंजना जेत्रे, कल्पना ठोंबरे, अरुणा भंडारे, मंजुषा आरबुने ,मीरा घटे, राणी लटींगे, किरण गालम, सुनंदा मानकर, माया बडकस, पद्मा लटेंगे, आरती अरबूने, अंजली पोरे, सारिका आरबुने, पार्वती इंगळे आदीसह स्वकुळ साळी समाजातील तरुणांनी युवतीने कष्ट घेतले.

जन्मोत्सव निमित्त शहरातून भगवान जिव्हेश्वर यांची भव्य अशी शोभायात्रा काढण्यात आली. यात कलशधारी महिला, पताकाधारी तरुण मुलं– मुली ज्येष्ठ नागरिक व टाळकरी मंडळ, भजनी मंडळ, आदींनी सहभाग नोंदवला. शोभायात्रा जगमित्र नागा मंदिर ते नेहरू चौक, देशमुख पार, वैद्यनाथ मंदिराच्या प्रांगणात थोडासा विसावा आणि त्याानंतर पुन्हा संत जगमित्र नागा मंदिराकडे रवाना झाली.

संपूर्ण देशभरात श्री भगवान जिव्हेश्वर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येते.विशेषतः महाराष्ट्र,आंध्र प्रदेश, तेलंगणा, कर्नाटक, तामिळनाडू, गुजरात,मध्य प्रदेश आदी राज्यातही आद्य वस्त्र निर्माता शिवपुत्र श्री भगवान जिव्हेश्वर यांचा जन्मोत्सव साजरा होतो.

पान ६ वरून...

### सोयाबिन,कापसाचे सरसकट

नसून लाखो शेतकरी निरक्षर असल्याने त्याांना ई पीक पाहणी करणे शक्य नाही ही बाब शासनाने विचारात घेऊन तात्काळ सरसकट शेतकऱ्यांना हेक्टरी पाच हजार रुपये अनुदान देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने तहसीलदार माजलगाव यांना निवेदनाद्वारे केली असून सरसकट शेतकऱ्यांना अनुदान न दिल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा शेतकरी कामगार पक्षाचे नेते, मध्यवर्ती समितीचे सदस्य भाई ॲड नारायण गोले पाटील यांच्यासह माजलगाव तालुका चिटणीस भाई मुंजा पांचाळ , सहचिटणीस भाई राहुल सोळंके, भाई सतीश शेजुळ, खजिनदार भाई विष्णू शेळके , पुरोगामी युवक संघटनेचे चिटणीस भाई आनंत चव्हाण, पुरोगामी युवा संघटनेचे तालुकाध्यक्ष भाई अशोक कुलकर्णी, भाई चांगदेव शेजुळ,भाई साळुजी हांडे ,भाई लक्ष्मण आप्पा चव्हाण, शिवाजी भाऊ शेजुळ यांच्यासह आदींनी दिला आहे.

### रामगिरी महाराज यांच्यावर तात्काळ

वर्षी सहा वर्षाच्या मुलीसोबत विवाह केला . ज्यांचे आदर्शच अत्याचारी आहेत , त्याांच्याबाबत अजून काय सांगायचे ? अशा स्वरुपात त्याा प्रवचनामध्ये मुस्लिम धर्मियांबाबत मोठ्या प्रमाणावर अनेक वक्तव्ये रामगीरी गुरु नारायण गिरी महाराज , सरला बेट , ता . वैजापूर जि . औरंगाबाद याने केली आहेत . या वक्तव्यामुळे व अशा प्रकारच्या प्रवचनामुळे हिंदू – मुस्लिम या दोन समाजामध्ये मने कलुषित करून जातीय तणाव , धार्मिक द्वेष पसरवण्याचा जाणीवपूर्वक प्रयत केला जात आहे . विधानसभा =निवडणुकीपूर्वी अशा भामट्या रामगीरी महाराजाकडून मुस्लिम धर्मियांविरोधात जाणुनबूजून धार्मिक भावना दुखवून जातीय दंगल घडविण्याच्या इराद्यात वक्तव्य करुन घेण्यात येत असल्याचा आरोपही निवेदनातून करण्यात आला आहे . मुस्लिम समाजात अनेक ठिकाणी इज्तेमा होतात . त्याामध्ये फक्त इस्लाम विषयी प्रवचन देऊन माणसाने समाजात माणूस म्हणून कसे जगावे याबाबत शिकवण दिली जाते . कोणत्याही धर्म व जाती विरोधात कोणत्याही प्रकारचे वक्तव्ये केली जात नाहीत . भामट्या रामगीरी महाराजाने केलेल्या वक्तव्यामुळे समाज जीवनातील एकोपा , सामाजिक भाव धोक्यात येऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची भीती आहे . सध्या गणेशोत्सव तोंडावर आलेला आहे . पाठोपाठ महाराष्ट्रात विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुका होणार आहेत . त्याामुळे आपण समस्येचे गांभीर्य ओळखून रामगीरी गुरु नारायण गिरी महाराज वर गुन्हा दाखल करून अटक करण्यात यावी .असे निवेदन मधे मागणी केली आहे यावेळी सकल मुस्लिम समाज पाटोदा चे पदाधिकारी , कार्यकर्ते तसेच मुस्लिम समाजातील मान्यवर उपस्थित होते .

### श्रेयस व प्रेयस याची जाणीव

रवींद्रजी देशमुख हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे कोषाध्यक्ष प्रा. प्रसाद देशमुख यांची विशेष उपस्थिती होती .

महाविद्यालयाची भूमिका स्पष्ट करून विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रात उच्च दर्जाचा संधी उपलब्ध करून देण्यासाठी आम्ही सतत तत्पर आहोत असे प्रतिपादन महाविद्यालयाच्या प्राचार्या तथा संचालिका डॉ . विद्या देशपांडे यांनी केले. अध्यक्षीय समारोप करतंना संस्थेचे कोषाध्यक्ष प्रा.प्रसाद देशमुख यांनी ''पालकांनी मुलींना त्याांच्या आवडीच्या क्षेत्रात करिअर करू द्यावे . '' अशी भूमिका व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. प्रवीण नवाडे ,सूत्रसंचालन प्रा.डॉ.राजकुमार यल्लावाड तर आभारप्रकटन प्रा.वीणा पारेकर यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पालक मेळावा समितीतील प्रा.डॉ.गुळभिले विद्या ,प्रा.डॉ. रंजना शहाणे , प्रा.डॉ. विलास देशपांडे ,प्रा. प्रवीण नवाडे , प्रा.वीणा पारेकर यांनी विशेष परिश्रम घेतले.यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वर्ग यांच्यासह पालक वृंद व विद्यार्थिनी समूह मोठ्या प्रमाणात उपस्थित होता.

### जकी बाबा सोशल वेलफेयर

मिटवून संसार सुरळीत चालू आहेत अशी अनेक कामे फाऊंडेशन तर्फे वर्षभरात करण्यात आले अशी माहिती त्याांनी दिली

या वेळी मनोज जरांगे पाटील माजलगावाला आले असता त्याणी जकी बाबा सोशल वेलफेअर फाऊंडेशनच्या महा रक्त दान शिबीरस भेट देऊन कामाचा आढावा घेतला व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या व फाऊंडेशन सोबत मिळुन काम करण्याचे आवाहन केले.तर आभार प्रदर्शन तयब सर यांनी मानले या कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी सयद खैसर,शाहेद भाई, इरफान मिर्झा, इम्रान खान,सलीम भैय्या,असद सर, रौफ लाला,मजहर, आलिम,अमीन, नाजेर,अजु,मारुफ इनामदार, साजेद,सोहेल,साहिल,शाहेद यासेर,ओस्मान,बबलु,रइस ,करामा,शाहेद,सत्तार टेलर,अल्ताफ, जमीर, हबीब, अनु, मुबीन, तोहीद, गुड्डु,ग़ज़मफर,रेहान,साहिल, आमेर, समीर, मुदस्सिर, जर्रार,हासन,साकिब,फैज़ान,सोफियान,शेर मोहम्मद,अब्दाली,जकी बाबा मित्र मंडळच्या सर्व स्वयंसेवकांनी अथक परीश्रम घेतले.

cmyk




# दुधव्यवसायातून नगरच्या श्रद्धाची तब्बल 1 कोटी रुपये उलाढाल

सध्या दुधाचे दर आणि त्यावरून होणारी शेतकऱ्यांची अवस्था पाहून कोणताही नवखा माणूस या व्यवसायात उडी टाकण्याचं धाडस न करण्याच्या मानसिकतेत असताना दहावी उत्तीर्ण झालेल्या श्रद्धा धवननं दुधव्यवसाय सुरु केला आणि आता ती या व्यवसायातून तब्बल १ कोटी रुपयांची कमाई करत आहे. स्टार्टअप सुरु करत दुधाच्या पदार्थांची ती विक्री करते. अहमदनगर जिल्ह्यातील निघोज गावातील धवन कुटुंब जनावरांची खरेदी विक्री करतात. छोटाच व्यवसाय. अल्पभूधारक. दहावीच्या परीक्षेनंतर उन्हाळ्याच्या सुट्टीत श्रद्धाने वडिलांना जनावरांच्या खरेदी विक्रीच्या कामात मदत करायला सुरुवात केली. सुट्टीच असल्यानं वडिलांसोबत जनावरांच्या बाजारात जायला लागली. म्हैस कशी ओळखायची, म्हैस खरेदी करण्यापूर्वी काय जाणून घ्यायला हवं, जनावरांचा लिलाव कसा करतात, योग्य किंमत कशी ओळखायची अशा छोट्या छोट्या गोष्टी तिनं शिकून घेतल्या. या सगळ्या अनुभवांमधून व्यवसायाचा प्रशिक्षणच तिला मिळत होतं.





दुधाच्या उत्पादनं बनवत केली विक्री

२०१३ मध्ये तिनं ठरवलं की घरीच गायी म्हशींना पाळून दुधव्यवसाय सुरु करायचा. हा तिचा निर्णय तिच्यासाठी कलाटणी देणारा ठरला. पण अभ्यास थांबवून हे सगळं तिला करायचं नव्हतं. मग एकीकडे अभ्यास, दुसरीकडे व्यवसाय असा ताळमेळ साधत तिनं या व्यवसायात उडी मारली. वडिलांचं संशोधन, अभ्यास आणि तिचं अद्ययावत ज्ञान अशी जोड देत तिनं व्यवसायाला सुरुवात केली. तोपर्यंत तिची ११ वी सुरु झाली होती. श्रद्धा फार्म्स असा स्टार्टअप तिनं सुरु केला. हळूहळू गायी, म्हशींची संख्या वाढवली, कामगार वाढवले आता तिच्याकडे एकूण १३० म्हशी आहेत. स्टार्टअपपेडीयाला दिलेल्या मुलाखतीनुसार, पोस्टऑफिस आणि वेगवेगळ्या दुकानांमधून राज्यभरात ती दुधापासून बनवलेले प्रोडक्ट पाठवते. यामध्ये तूप, लोणी, लस्सी , ताक आणि दही याचा समावेश आहे.

एका वर्षात कोट्यवधींची उलाढाल

नैसर्गिक पद्धतीनं ही सर्व उत्पादनं ती बनवते. श्रद्धा फार्मचा एक टन बायागॅसचा प्लांटही आहे. जिथं सेंद्रिय खत बनवलं जातं. हे खत शेतकऱ्यांना तसेच कृषी कंपन्यांना विकलं जातं. अजूनतरी तिच्या स्टार्टपमधील उत्पादनं इकॉमर्सवर नसली तरी भारतभर इमेलच्या माध्यमातून तिला ऑर्डर्स मिळू लागल्या आहेत. आणि महत्वाचं म्हणजे तिनं वर्षभरात या व्यवसायातून एक कोटी रुपयांची कमाई केली आहे.

## कन्नड येथे आज आले परिषदेचे आयोजन



कन्नड : सहकार परिषद, ऊस परिषदेनंतर स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने आता रविवारी (दि. १८) कन्नड येथे आले परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

पहिल्यांदाच राज्यात अशा प्रकारे आले परिषद घेतली जात असल्याची माहिती स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रदेश सदस्य भाऊसाहेब थोरात यांनी दिली. या परिषदेला स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख राजू शेट्टी यांची प्रामुख्याने उपस्थिती राहणार आहेत. इतरही प्रदेश कारखान्यातील नेते मंडळी या परिषदेत सहभागी होणार असल्याचे थोरात म्हणाले. आले परिषदेत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील आले उत्पादक भागातील शेतकऱ्यांसह सोलापूर, सातारा, सांगली आदी जिल्ह्यांतील तसेच महाराष्ट्रातील इतर भागातील ही साधारणतः ५००० आले उत्पादक सहभागी होतील, अशी आशा स्वाभिमानीचे जिल्हाध्यक्ष कृष्णा साबळे यांनी व्यक्त केली. या परिषदेमध्ये आल्यासंबंधी अत्यंत महत्त्वाच्या जवळपास ११ मुद्द्यांवर प्रामुख्याने चिंतन होणार आहे. सोबतच परिषदेत सर्व मुद्द्यांना अनुसरून ठरावही घेतले जातील. घेतलेल्या ठरावासंदर्भात शासनाला अवगत करण्यासाठी स्वाभिमानीचे प्रमुख राजू शेट्टी यांच्या नेतृत्वात एक शिष्टमंडळ कृषिमंत्री व मुख्यमंत्री यांची भेट घेऊन त्यांना मागण्यांसंदर्भात शासन निर्णय घेण्याविषयी अवगत करणार असल्याचे जिल्हाध्यक्ष श्री. साबळे म्हणाले. सरकारच्या आयात निर्यात संबंधीच्या धोरणामुळे शेतकरी कर्जबाजारी झाला आहे. त्यामुळे तो कर्ज भरू शकत नाही. 'स्वाभिमानी'चे नेते राजू शेट्टी यांनी या संदर्भात घेतलेल्या भूमिकेला पाठिंबा म्हणून जिल्ह्यातील लाखभर शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्याची मागणी करणारे व हमीभाव गॅरंटी कायदा संसदेत पारित करण्याची मागणी लेखी घेतली जाईल, असे स्वाभिमानी जिल्हाध्यक्ष कृष्णा साबळे यांनी स्पष्ट केले.

आले परिषदेचे प्रमुख विषय :

आले संशोधन केंद्र लवकरात लवकर उभारावे. आल्याचे भौगोलिक मानांकन करण्यात यावे. आले पिकाला विमा संरक्षणात स्थान मिळावे. महसूल दप्तरी आले पीकपेरा नोंद घ्यावी. आले पिकावर आधारित प्रक्रिया उद्योग कन्नड परिसरात वाढण्यास चालना द्यावी. आले विक्रीसाठी बाजार समितीमार्फत खरेदी परवाने व बँक गॅरंटी देणाऱ्या सक्षम व्यापाऱ्याकडे विक्री व्हावी. बाजार समितीचे त्यावर नियंत्रण असावे. आल्याचे चांगल्या प्रतीचे बियाणे शासनामार्फत त विनामूल्य शेतकऱ्यांना उपलब्ध करून द्यावे. आले व्यापाऱ्यांनी सौदे करताना मिश्र पद्धतीने करावे, नवे जुने वेगळे खरेदी करू नये.

## प्रोत्साहन'चे ३३ हजार शेतकऱ्यांना मिळणार अनुदान

पुणे : नियमित पीककर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या महात्मा जोतिराव फुले शेतकरी प्रोत्साहन योजनेअंतर्गत ३३ हजार शेतकऱ्यांना प्रत्येकी ५० हजार रुपये अनुदान देण्याची प्रक्रिया सहकार आयुक्तालयाद्वारे सुरू करण्यात आली आहे.

यासाठी २०१९ मध्ये पात्र ठरलेल्या परंतु आधार प्रमाणीकरण न झालेल्या शेतकऱ्यांनी ७ सप्टेंबरपर्यंत आधार प्रमाणीकरण करून घ्यावे, असे आवाहन सहकार आयुक्तालयाकडून करण्यात आले आहे. तर, सर्व जिल्हा उपनिबंधकांनी आपल्या कार्यक्षेत्रातील सहकारी, खासगी आणि शासकीय बँकांना याबाबत माहिती देण्याच्या सूचना केल्या आहेत. शेतकऱ्यांना ७ सप्टेंबरपर्यंत आधार प्रमाणीकरणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. आधार प्रमाणीकरण करण्यासाठी महा-आयटीमार्फत लघू संदेश देण्यात आला आहे. तसेच यासंदर्भात संबंधित सहकारी, राष्ट्रीयीकृत बँकांनी देखील शेतकऱ्यांना व्यक्तीशः कळविण्यात येणार आहे. लाभासाठी पात्र ठरलेले आणि त्याअनुषंगाने विशिष्ट क्रमांक देण्यात आलेले, परंतु आधार प्रमाणीकरण झाले नाही, अशा शेतकऱ्यांनी संबंधित बँक शाखेची संपर्क साधून आधार प्रमाणीकरण करून घ्यावे, असे आवाहन सहकार आयुक्त दीपक तावरे यांनी केले आहे.

## सिंचन विहिरीच्या अनुदानात वाढ

राज्यातील शेतकऱ्यांसाठी एक महत्त्वाची बातमी आहे. राज्यातील शेतकऱ्यांना आता सिंचन विहिरीसाठी अधिकचे अनुदान मिळणार आहे. शेतीसाठी सिंचन हा एक महत्वाचा विषय आहे. शेतकऱ्यांचे जास्तीत जास्त उत्पादन वाढावे यासाठी सरकार वेगवेगळ्या योजना घेऊन येतात. शेतकऱ्यांना सिंचनासाठी सुद्धा सरकार अनुदान पुरवतात. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना देखील अशीच एक महत्वाकांक्षी योजना आहे. या अंतर्गत शेतकऱ्यांसाठी सिंचन विहिरीसाठी अनुदान दिले जाते. या योजने अंतर्गत पूर्वी सिंचन विहिरीसाठी चार लाख रूपयांपर्यंतचे अनुदान दिले जात होते. मात्र आता अनुदानाची ही मर्यादा वाढवण्यात आली आहे.

शासनाच्या या महत्त्वाकांशी योजने अंतर्गत दिल्या जाणाऱ्या अनुदानात एक लाख रूपयांची वाढ झाली आहे. म्हणजेच आता महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत सिंचन विहिरीसाठी पाच लाख रूपयांचे अनुदान मिळणार आहे. विशेष म्हणजे या निर्णयाची अंमल बजावणी एक एप्रिल २०२४ पासून होणार आहे. यामुळे राज्यातील शेतकऱ्यांना नक्कीच मोठा दिलासा मिळणार असून शासनाच्या या निर्णयाचे शेतकऱ्यांच्या माध्यमातून तोंड भरून कौतुक केले जात आहे. गेल्या काही वर्षांमध्ये महागाई मोठ्या प्रमाणात वाढली आहे. पेट्रोल डिझेलचे दरही विक्रमी वाढले आहेत. यामुळे शेतीकामांसहित सर्वच कामांचे मजुरीचे दर वाढले आहेत. यामुळे सद्यःस्थितीत मजुरीमध्ये झालेली वाढ व बांधकाम विभागाची चालू दरसूची विचारात घेता अनुदानाच्या आर्थिक मर्यादेत वाढ करण्याचा मोठा निर्णय महाराष्ट्र राज्य शासनाने घेतला आहे. यानुसार आता मनरेगा अंतर्गत सिंचन विहिरीसाठी पाच लाख रुपयांचे अनुदान मिळणार आहे. अनुदानात वाढ झाली असल्याने राज्यातील शेतकऱ्यांच्या माध्यमातून समाधान व्यक्त करण्यात आले आहे. बांधकाम विभागाच्या चालू दरसूचीनुसार व केंद्र सरकारच्या १ एप्रिल २०२४ पासून मनरेगांतर्गत लागू झालेले मजुरी दर रक्कम २९७ रुपये प्रतिदिन विचारात घेऊन, सिंचन विहिरीच्या बांधकामाची सुधारित अंदाजित रक्कम ४ लाख ९९ हजार ४०३ रुपये एवढे अनुदान देण्यात येणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे.



## अधिक उत्पादन देणारे गव्हाचे नवीन वाण; जाणून घ्या वैशिष्ट्ये

शेतकऱ्यांचे कृषी उत्पादन उत्पन्न वाढावे यासाठी वेगवेगळ्या जाती विकसित करण्यात येत आहेत. नुकतेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वेगवेगळ्या पिकांच्या अधिक उत्पादन देणाऱ्या जाती प्रसारित केल्या आहेत.

गहू हे राज्यासहित संपूर्ण देशभरात उत्पादित होणारे एक महत्त्वाचे अन्नधान्य पीक आहे. धान म्हणजे भातासारखेचं गव्हाचेही आपल्या भारतात मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतले जाते. दिल्ली, हरियाणा, उत्तर प्रदेश, पंजाब, राजस्थान, गुजरातसहित देशातील अनेक राज्यांमध्ये गव्हाचे उत्पादन घेतले जाते. आपल्या महाराष्ट्रातही पश्चिम महाराष्ट्र सहित सर्वत्र गव्हाची लागवड नजरेस पडते. यामुळे गहू उत्पादक शेतकऱ्यांचे उत्पादन वाढावे यासाठी शासन आणि प्रशासनाच्या माध्यमातून विशेष प्रयत्न केले जात आहेत. देशातील शास्त्रज्ञांच्या माध्यमातूनही शेतकऱ्यांच्या उत्पादन वाढीसाठी प्रयत्न होत आहेत. याच प्रयत्नाचा एक भाग म्हणून देशातील शास्त्रज्ञांनी अलीकडेच गव्हाची एक नवीन जात विकसित केली आहे.



११ ऑगस्ट रोजी, नवी दिल्ली येथे देशाचे पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते विविध पिकांच्या १०९ नव्या वाणांचे देशाला अनावरण करण्यात आले. या १०९ जातींमध्ये गव्हाच्या या अलीकडेच विकसित झालेल्या जातीचा देखील समावेश होता. गव्हाची ही जात भारतीय कृषी संशोधन संस्था, प्रादेशिक केंद्र, इंदूर यांनी विकसित केली आहे. या गव्हाच्या सुधारित जातीची थोडक्यात माहिती आणि वैशिष्ट्ये जाणून घेऊ या.

गव्हाची नवीन जात : गव्हाच्या या नवीन जातीचे नाव आहे 'एचआय १६६५' म्हणजे 'पुसा शरबती' . गव्हाची ही नवीन जात वेळेवर पेरणी करण्यासाठी शिफारशीत करण्यात आली आहे. मर्यादित सिंचन परिस्थितीमध्ये या जातीची लागवड करता येणे शक्य आहे. एचआय १६६५ गव्हाची वैशिष्ट्ये : ही जात विशेषतः द्वीपकल्पीय आणि मध्य भारतासाठी शिफारसीत आहे. या जातीच्या गव्हाची उंची ८५-९० सेमी असल्याचे आढळून आले आहे आणि १००० दाण्यांचे वजन ४४ ग्रॅम असल्याचे आढळून आले आहे. ही जात काळा आणि भुरा तांबेरा रोगास प्रतिकारक आहे. गव्हाची ही जात ११०-११५ दिवसांत तयार होते. उत्पादन क्षमतेबद्दल बोलायचे झाल्यास, ही जात ३३.० क्विंटल/हेक्टरपर्यंत (मर्यादित सिंचन परिस्थितीत) उत्पन्न देऊ शकते. पण संभाव्य धान्य उत्पादन ४३.५ क्विंटल/हेक्टर इतके आहे.




### जागतिक दिवस:
### आंतरराष्ट्रीय आद्यनिवासी लोक दिन
### जागतिक हेलियम दिवस

#### महत्वाच्या घटना

१८०० : ब्रिटीश कालीन भारतात कलकत्ता या ठिकाणी यांनी फोर्ट विल्यम महाविद्यालयाची स्थापना केली.
१८४१ : जगात सर्वप्रथम ब्रिटनमधे राष्ट्रीय अग्निशमन दलाची स्थापना
१८६८ : फ्रेंच खगोलशास्त्रज्ञ ज्यूलस जानसेन यांनी हेलियम वायूचा शोध लावला.
१९२० : अमेरिकेच्या संविधानात १९ वा बदल झाला आणि स्त्रियांना मतदानाचा अधिकार मिळाला. पुरुषांच्या सोबत आपल्यालाही मतदानाचा अधिकार मिळावा यासाठी अमेरिकेतल्या स्त्रियांनी आंदोलन सुरू केलं होतं. त्या आंदोलनाला अखेर यश मिळालं आणि १८ ऑगस्ट १९२० साली अमेरिकेतल्य स्त्रियांना मतदानाचा अधिकार देण्यात आला.
१९४२ : शेरपूर येथील स्वातंत्र्यसैनिकांच्या एका समुहाने उत्तर प्रदेशातील गाझियाबाद जिल्ह्यातील मोहम्मदाबाद येथे तिरंगा फडकावला.
१९४५ : इंडोनेशियाच्या पहिल्या अध्यक्ष पदावर सुकारणो हे कार्यरत झाले.
१९४९ : हंगेरी राष्ट्राने प्रजासत्ताक राष्ट्राची घटना स्वीकारली.
१९५१ : पहिल्या पंचवार्षिक योजणे दरम्यान पश्चिम बंगाल मधील खडगपूर येथे भारतीय तंत्रज्ञान संस्थेची स्थापना करण्यात आली.
१९५८ : बांग्लादेश चे ब्रोजन दास इंग्लिश खाडी पार करणारे पहिले आशियाई ठरले.
१९६३ : जेम्स मेरेडिथ हा मिसिसिपी विद्यापीठातून स्नातक होणारा पहिला श्यामवर्णीय व्यक्ती झाला.
१९९९ : कोणताही गुन्हा शाबित झाल्यानंतर तुरुंगवास भोगत असलेल्या अथवा कोणत्याही कारणासाठी पोलिस कोठडीत ठेवण्यात आलेल्या व्यक्तीस मतदानाचा हक्क बजावता येणार नाही असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले.
२००५ : ईंडोनेशियाच्या जावा बेटावर वीज गेल्यामुळे १० कोटि लोक अंधारात
२००८ : हक्कभंगाची कारवाई होण्याची शक्यता असल्यामुळे पाकिस्तानचे अध्यक्ष परवेझ मुशर्रफ यांनी राजीनामा दिला.
२०१८ : इमरान खान हे पाकिस्तानचे पंतप्रधान म्हणून निवडून आले.

#### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७०० : थोरले बाजीराव पेशवे ऊर्फ श्रीमंत बल्लाळ बाळाजी भट (मृत्यू: २८ एप्रिल १७४०)
१७३४ : रघुनाथराव पेशवा (११ डिसेंबर १७८३)
१७९२ : युनायटेड किंगडमचे पंतप्रधान जॉन रसेल यांचा जन्म.
१८७२ : 'गायनाचार्य' पं. विष्णू दिगंबर पलुसकर संगीतज्ञ, गायक, संगीतप्रसारक आणि गांधर्व महाविद्यालयाचे संस्थापक (मृत्यू: २१ ऑगस्ट १९३१)
१८८६ : सेवानंद गजानन नारायण तथा बाळूकाका कानिटकर अनाथ विद्यार्थी गृहाचे एक संस्थापक (मृत्यू: १२ नोव्हेंबर १९५९)
१९०० : विजयालक्ष्मी पंडीत राजदूत, मुत्सद्दी व राजकारणी (मृत्यू: १ डिसेंबर १९९०). संयुक्त राष्ट्राच्या आमसभेच्या पहिल्या भारतीय अध्यक्षा विजयालक्ष्मी पंडित यांचा आज जन्मदिवस आहे. विजयालक्ष्मी पंडित यांचा जन्म १८ ऑगस्ट १९०० रोजी झाला. त्या पंडित नेहरुंच्या भगिनी होत्या. १९५३ ते १९५४ या काळात त्या संयुक्त राष्ट्राच्या आमसभेच्या आठव्या अध्यक्षा होत्या.
१९२३ : सदाशिव ऊर्फ 'सदू' शिंदे लेगस्पिनर व गुगली गोलंदाज (मृत्यू: २२ जून १९५५)
१९३० : संपूर्ण सिंग कालरा ऊर्फ 'गुलजार' गीतकार, कवी, लेखक व दिग्दर्शक
१९३६: रॉबर्ट रेडफोर्ड हॉलिवूडमधील तगडा अभिनेता, दिग्दर्शक, निर्माता, उद्योगपती, पर्यावरणवादी आणि दानशूर
१९५६ : संदीप पाटील धडाकेबाज फलंदाज
१९६७ : दलेर मेहंदी भांगडा गायक / पंजाबी पॉप गायक
१९८० : प्रीती जंघियानी अभिनेत्री

#### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१२२७ : मंगोल सम्राट चंगीझ खान यांचे निधन.
१८५० : फ्रेंच लेखक ऑनोरे दि बाल्झाक यांचे निधन.
१८८६ : मॉर्टिस लॉक चे शोधक एली व्हिटनी ब्लेक यांचे निधन. (जन्म: २७ जानेवारी १७९५)
१९१९ : सीग्राम कंपनीचे संस्थापक जोसेफ ई. सीग्राम यांचे निधन. (जन्म: १५ एप्रिल १८४१)
१९४० : वॉल्टर ख्राइसलर 'ख्राइसलर' कंपनीचे संस्थापक (जन्म: २ एप्रिल १८७५)
१९४५ : नेताजी सुभाषचंद्र बोस (जन्म: २३ जानेवारी १८९७ कटक, ओरिसा)
१९७९ : वसंतराव नाईक महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, रोजगार हमी योजनेचे जनक (जन्म: १ जुलै १९१३)
१९९० : प्रसिद्ध भारतीय हिंदी साहित्यकार, प्रचारक व सरस्वती पत्रिकेचे संपादक तथा पत्रकार श्री नारायण चतुर्वेदी यांचे निधन.
१९९८ : पर्सिस खंबाटा अभिनेत्री, मॉडेल आणि लेखिका (जन्म: २ आक्टोबर १९४८)
२००८ : नारायण धारप रहस्यकथाकार (जन्म: २७ ऑगस्ट १९२५)
२००९ : दक्षिण कोरियाचे वे८ राष्ट्राध्यक्ष किम दे-जुंग यांचे निधन.
२०१२ : भारतीय पत्रकार आणि लेखक रा. की. रंगराजन यांचे निधन.

## थोडक्यात



### बुद्धिबळ स्पर्धेमध्ये विवेकानंद इंग्लिश स्कूल प्रथम

मंठा : तालुक्यातील केंधळी येथील विवेकानंद इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी तालुकास्तरीय पावसाळी क्रीडा स्पर्धेमध्ये घवघवीत यश संपादन केले.१४ वयोगटातील विद्यार्थ्यांनी ह्या स्पर्धेमध्ये भाग घेतला होता. मुलांमधून आयुष शिंदे,मेघराज गोसावी,देवेश काळे,योगेश सराफ,सोमेश चोधरी तर मुलींमधून समृद्धी बोडे,समृद्धी कदम,तन्वी निर्वळ, श्रावणी जाधव,ज्ञानेश्वरी सानप यांनी प्रथम क्रमांक पटकावला.या यशाबद्दल शाळेचे अध्यक्ष शेषराव बाहेकर,संदीप बाहेकर, श्रीमती वर्षा बाहेकर, प्राचार्या रश्मी यादव यांनी क्रीडा शिक्षक ज्ञानेश्वर जाधव आणि विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

### मासिक नवमी निमित्ताने भाविकांना महाप्रसादाचे वाटप

युसूफवडगांव : केज तालुक्यातील युसूफवडगांव येथील श्रीराम मंदिरात मासिक नवमी निमित्ताने श्री स्वामी समर्थ प्रतिष्ठान रामवडगांवच्या वतीने राम भक्तांसाठी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. गावचे ग्रामदैवत असलेले प्रभु श्रीराम यांच्या मंदिरात दर महिन्याला नवमीच्या निमित्ताने भाविक भक्तांसाठी मानकऱ्यांच्या वतीने महाप्रसादाचे वाटप



करण्यात येते.यावेळी श्रावण मास मधील नवमी असल्याने याला विशेष महत्व प्राप्त झाले होते.नवमीची सुरुवात पहाटे प्रभु श्रीराम यांच्या मुर्तीस दुग्धाभिषेक घालुन झाली.यावेळी श्री स्वामी समर्थ प्रतिष्ठानचे सर्व सदस्य अभिषेकास हजर होते,तर सायंकाळी मंदिरात ८ वाजता गावकऱ्यांच्या उपस्थितीत आरती झाल्यानंतर गावकरी व राम भक्तांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.यावेळी मोठ्या संख्येने गावकरी रामभक्त हजर होते.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अध्यक्ष बापुसाहेब भुसारी,उपाध्यक्ष विकास जाधव,महादेव मोडवे,अनिल निकम,अनंत जाधव,अमोल थळकरी,बाळासाहेब सपकाळ,छत्रुगन निकम,महादेव सौंदणे व पत्रकार सचिन उजगरे व श्री स्वामी समर्थ प्रतिष्ठानच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

### जय किसान गणेश मंडळाच्या अध्यक्षपदी शुभम नित्के

धारूर : शहरातील सर्वात जुने गणेश मंडळ म्हणून जय किसान गणेश मंडळाची ओळख आहे.गेल्या साठ वर्षांपासून गणेशोत्सव काळात विविध सामाजिक लोक उपयोगी कार्यक्रमाचे आयोजन करून गणेशोत्सव साजरा केला जातो याही



वर्षी गणेशोत्सव साजरा करण्यासाठी (ता.१४) रोजी कार्यकरणी निवडी बाबत बैठक आयोजित केली होती या बैठकीत सर्वानुमते अध्यक्षपदी शुभम निकते उपाध्यक्ष सुरज तिबोले,सचिवपदी साई शिनगारे यांची निवड करण्यात आली आहे. जय किसान गणेश मंडळाच्या वतीने विविध सामाजिक लोक उपयोगी उपक्रम राबवून गणेशोत्सव साजरा केला जातो. याही वर्षी जोशात गणेशोत्सव साजरा करण्यासाठी कार्यकरणी निवडी बाबत बैठक आयोजित केली होती. मारुती जाधव,शिवाजी पवार,गणेश सावंत,अण्णा तिबोले,डॉ मयूर सावंत,राहुल कुठाळे, कुलदीप दरेकर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली या बैठकीत सर्वानुमते अध्यक्षपदी शुभम निकते,उपाध्यक्ष सुरज तिबोले,सचिव साई शिनगारे,कोषाध्यक्ष अमोल जगताप,प्रताप तिबोले(सहकोषाध्यक्ष)पवन नित्के (सह सचिव)प्रदीप जाधव,ओम सावंत,जयम जगताप (सांस्कृतिक अध्यक्ष) कृष्णा गव्हाणे (सह सांस्कृतिक) महेश भैरे,गणेश गिरी (वाद्य पथक अध्यक्ष)बंटी जाधव,व्यंकटेश फुंन्ने,यश उमाप,साई साखरे अभि जगताप (सोशल मीडिया) सागर ढाणे,ज्योतिबा तिबोले,ऋषिकेश गव्हाणे (नियोजन प्रमुख) यांच्या निवडी करण्यात आल्या या निवडी बाबत सर्वत्र स्वागत केले जात आहे.

# मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचा लढा शेकापने आक्रमकपणे लढला - भाई मोहन गुंड

## शेतकरी कामगार पक्षाचे तालुका अधिवेशनात विविध पदाधिकाऱ्यांच्या निवडी

माजलगाव । प्रतिनिधी

मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचा लढा शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्या सह डाव्या विचाराच्या लोकांनी महाराष्ट्रातल्या तळागाळातील शेतकरी, कष्टकऱ्यांना सोबत घेऊन आक्रमकपणे लढला त्यामुळेच मुंबई महाराष्ट्राची होऊ शकली असे प्रतिपादन शेतकरी कामगार पक्षाचे राज्य चिटणीस मंडळाचे सदस्य भाई मोहन गुंड यांनी माजलगाव तालुक्यातील शुक्ल तीर्थ लिमगाव येथे शेतकरी कामगार पक्षाच्या अधिवेशनात केले.



महाराष्ट्र राज्याचा इतिहास हा क्रांतिकारी असून छत्रपती शिवाजी महाराज, क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले, कर्मवीर भाऊराव पाटील, लोकराजा राजर्षी शाहू महाराज, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, संत गाडगेबाबा, क्रांतिसिंह नाना पाटील या क्रांतिकारक महापुरुषांनी महाराष्ट्राला पुरोगामीत्वाची देण दिलेले असून या महापुरुषांचा वारसा शेतकरी कामगार पक्ष कायम जपत आलेला असून महात्मा ज्योतिबा फुले यांच्या सत्यशोधक विचाराला केंद्रस्थानी ठेवून शेतकरी कामगार पक्ष लढत आहे, संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात शेतकरी कामगार पक्षासह डाव्या विचाराच्या लोकांनी अग्रभागी राहून अखंड महाराष्ट्राला जागृत करून मुंबई सह संयुक्त महाराष्ट्राचा लढा लढला त्यातूनच मुंबई महाराष्ट्राला मिळाली. महाराष्ट्राचा राजकारणात शेतकरी कामगार पक्षाने एक वेगळा आदर्श निर्माण केला असून रोजगार हमी योजना, कापूस एकाधिकारशाही ही शेतकरी कामगार पक्षाने महाराष्ट्राला दिलेली देण आहे. शेतकरी, कष्टकरी, कामगारांच्या प्रश्नावर शेतकरी कामगार पक्षाने कधीही तडजोड केली नाही,श्रमिकांशी बांधिलकी जपत शेतकरी कामगार पक्ष कायम रस्त्यावर मोर्चे आंदोलने व लढे लढत आला आहे.

आज महाराष्ट्रात शेतकरी आत्महत्येचा आकडा हजारोने वाढत असताना राज्यकर्ते भ्रष्टाचार करण्यात व केवळ सत्तेचा वापर स्वार्थासाठी करण्यात मश्गुल आहेत. महाराष्ट्राला आज शेतकरी कामगार पक्षाच्या विचाराची गरज असून शेतकरी कामगार पक्षच महाराष्ट्राचे हित जोपासू शकतो असे प्रतिपादन शेतकरी कामगार पक्षाच्या माजलगाव तालुका अधिवेशनात शुक्लतीर्थ लिमगाव येथे केले.यावेळी भाई मुंजा पांचाळ यांची माजलगाव तालुका चिटणीस पदी एक मताने निवड करण्यात आली तर सहचिटणीसपदी भाई राहुल सोळंके,भाई सतीश शेजुळ, खजिनदारपदी भाई विष्णू शेळके चिटणीस मंडळ सदस्यपदी श्रीराम शेवाळे व सदस्यपदी भाई सुभाष थोरात, भाई मनोहर माने, भाई लक्ष्मण बादाडे,भाई प्रकाश नायबळ,भाई अभिजीत आठवे, भाई गोविंद आढाव, भाई बाबुराव शेळके यांची निवड करण्यात आली तर शेतकरी सभेच्या तालुका अध्यक्षपदी भाई सुदाम चव्हाण तर चिटणीसपदी भाई माऊली चंदनशिव, सहचिटणीस भाई साळुजी हांडे, खजिनदार भाई चांगदेव शेजुळ चिटणीस मंडळ सदस्य भाई जनार्दन कुदळे, यांची तर पुरोगामी युवक संघटनेच्या संघटनेच्या तालुकाध्यक्षपदी भाई अशोक बाप्पा कुलकर्णी व तालुका चिटणीसपदी अनंत चव्हाण, तालुका सहचिटणीस पदी भाई गणेश सोनटक्के, खजिनदार भाई किशोर पांचाळ यांची निवड करण्यात आली.यावेळी व्यासपीठावर अधिवेशनाच्या अध्यक्षपदी भाई लक्ष्मण आप्पा चव्हाण,रामभाऊ शेंडगे, भाई ॲड नारायण गोले पाटील यांची उपस्थिती होती, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भाई भास्कर कांबळे यांनी केले तर आभार प्रदर्शन भाई माऊली चंदनशिव यांनी केले.यावेळी भाई सुभाष शेरकर, भाई मुकेश शेरकर,भाई रामभाऊ शिंदे, पाराजी हांडे, भाई नामदेव शेरकर, भाई सचिन पांचाळ, नवनाथ कांबळे यांनी विशेष परिश्रम घेतले यावेळी कार्यकर्त्यांसह शेकडो गावकरी उपस्थित होते.

### शेकापच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडी

भाई मुंजा पांचाळ यांची माजलगाव तालुका चिटणीस पदी एक मताने निवड करण्यात आली तर सहचिटणीस पदी भाई राहुल सोळंके, भाई सतीश शेजुळ, खजिनदारपदी भाई विष्णू शेळके चिटणीस मंडळ सदस्य पदी श्रीराम शेवाळे.शेतकरी सभेच्या तालुका अध्यक्षपदी भाई सुदाम चव्हाण तर चिटणीसपदी भाई माऊली चंदनशिव, सहचिटणीस भाई साळुजी हांडे, खजिनदार चांगदेव शेजुळ चिटणीस मंडळ सदस्य जनार्दन कुदळे, यांची तर पुरोगामी युवक संघटनेच्या संघटनेच्या तालुकाध्यक्षपदी भाई अशोक बप्पा कुलकर्णी व तालुका चिटणीसपदी अनंत चव्हाण,तालुका सहचिटणीस पदी भाई गणेश सोनटक्के, खजिनदार भाई किशोर पांचाळ यांच्या निवडी अधिवेशनात एक मताने करण्यात आल्या.

# लाडकी बहिणीचे ३३ हजार ८५१ महिलांचे अर्ज मंजूर- घाटगे

घनसावंगी । प्रतिनिधी

राज्य सरकारच्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या विधानसभा मतदारसंघ क्षेत्राच्या समितीवर सतीश घाटगे यांची अध्यक्ष म्हणून निवड झाल्यानंतर या समितीची पहिली बैठक १५ ऑगस्ट रोजी तहसील कार्यालयात पार पडली. सतीश घाटगे यांनी या बैठीकीत ३३ हजार ८५१ महिलांचे अर्ज मंजूर केले आहे.



महायुती सरकारने आर्थिक दुर्बल घटकांतील महिलांना आधार देण्यासाठी मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना सुरु केली आहे.या योजनेचा लाभ शेवटच्या गरीब महिलापर्यंत पोहोचविण्यासाठी शासनाने विधानसभा क्षेत्रनिहाय समिती तयार केली आहे.त्यानुसार घनसावंगी विधानसभेच्या समितीच्या अध्यक्षपदी समृद्धी कारखान्याचे चेअरमन तथा भाजप नेते सतीश घाटगे पाटील यांची यांची शासनाने निवड केली आहे. स्वातंत्र्यदिनी तहसील कार्यालयात सतीश घाटगे यांच्या अध्यक्षतेखाली मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा आढावा घेण्यात आला. या बैठकीत घनसावंगी विधानसभा मतदारसंघ क्षेत्रातून ३५ हजार ५९३ महिलांचे अर्ज आले होते. त्यापैकी ३३ हजार ८५१ अर्जांना सतीश घाटगे यांनी तत्काळ मंजुरी दिली आहे. मंजुरी मिळालेल्या महिलांना ३ हजार रुपये त्यांच्या आधार लिंक खात्यावर जमा होणार आहे. नव्याने अर्ज केलेल्या महिला लाभार्थींचे अर्ज मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या पोर्टलवर गतीने अपलोड करून सर्व महिलांचे अर्ज मंजूर करण्याच्या सूचना तालुका प्रशासनास सतीश घाटगे यांनी दिल्या. एकही पात्र महिला भगिनी या योजनेच्या लाभापासून वंचित राहणार नाही. यांची काळजी घेण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या. या बैठकीस तहसीलदार योगिता खटावकर, गट विकास अधिकारी अमित कदम, मुख्यधिकारी डी. यु. भांबरे, समितीचे सदस्य रवींद्र तौर, तात्यासाहेब चिमणे, विनोद दाभेराव, शिवाजीराव कंटूले, रामेश्वर गरड, विष्णुपंत जाधव, किसान कोरडे लक्ष्मण कंटूले, राजकुमार उगले, आत्माराम मोरे, अनुमत अर्दड, महादेव चिमणे आदी उपस्थित होते.

अनेक महिलांचे बँक खाते आधार सोबत लिंक केलेले नाही. त्यामुळे त्यांना लाडकी बहिण योजनेचे पैसे मिळाले नाही. ज्या महिलांचे खाते लिंक नाही. त्यांनी तातडीने आपले खाते आधार सोबत लिंक करण्याचे आवाहन सतीश घाटगे यांनी दिले आहे. अर्ज केलेल्या प्रत्येक लाभार्थीचे अर्ज मंजूर होणार आहे. चुकीच्या अफवावर विश्वास ठेवू नये असेही आवाहन त्यांनी केले आहे.

# मराठी साहित्य संमेलनात होणार प्रतिभावंतांचा गौरव!

परभणी । प्रतिनिधी

संत अवजीनाथ महाराज, संत वामनभाऊ महाराज, महान राष्ट्रसंत भगवानबाबा, वारकरी अध्यात्म विश्वभर पोहचवणारे न्यायाचार्य डॉ.नामदेव महाराज शास्त्री भगवानगड, ह.भ.प.श्री विठ्ठल महाराज गहिनीनाथगड यांच्या कृपा आशिर्वादाने अहिल्या नगर येथे संपन्न होणाऱ्या दुसऱ्या मराठी साहित्य संमेलनात साहित्य क्षेत्रातील दिग्गज लेखकांचा जगद्विख्यात तत्वज्ञानी, थोर प्रबोधनकार, समाजसुधारक राष्ट्रसंत भगवानबाबा साहित्यरत्न पुरस्कार २०२४ देऊन दिनांक २५/८/२०२४ रविवार रोजी गंगा लान्स, संत भगवानबाबा चौक, निर्मल नगर, अहिल्या नगर (अहमदनगर) येथे गौरविण्यात येणार आहे. नुकतीच खालील नावाची घोषणा वंजारी महासंघ महाराष्ट्र संस्थापक अध्यक्ष, सुप्रसिद्ध विचारवंत, साहित्यिक गणेश खाडे यांनी एका पत्रकान्वये केली आहे. सदर पुरस्कार कथा, कविता व समीक्षा क्षेत्रातील प्रतिभावंतांना देण्यात येणार असून पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष, महासंघाचे मार्गदर्शक सुप्रसिद्ध कवी प्रा.वा.ना.आंधळे यांनी ही निवड केली आहे.

पुरस्कार प्राप्त मान्यवर: १.प्रा.डॉ.शिवाजी हुसे (छ.संभाजीनगर) २.प्रा.डॉ.शिवाजी नागरे (अकोला) ३.प्रा.डॉ.विठ्ठल जायभाये (परभणी) ४. चंद्रकांत धस (पुणे) ५.रेखा शेळके-संखे (मुंबई) ६.प्रा.डॉ.रामकिसन दहिफळे (छ.संभाजीनगर) ७.प्रा.डॉ.द्वारका मुंडे (बीड) ८. रंजना सानप (सातारा) ९.श्री.सोपान हळमकर बीड) १०. मनोहर आंधळे (जळगाव) ११. तुळशीराम बोबडे (अकोला) १२. अलकनंदा घुगे-आंधळे (छ.संभाजीनगर) १३. रमेश आव्हाड (नाशिक) १४. प्रीती बेटकर (पुणे) १५. जयश्री वाघ (नाशिक) १६. छाया वाघ-जायभाये (जालना) सर्व पुरस्कारार्थींचे वंजारी महासंघाच्यावतीने मनःपूर्वक अभिनंदन! संमेलन यशस्वीतेसाठी स्वागताध्यक्ष अंतरराष्ट्रीय कुस्तीपटू राजकुमार आघाव, सह स्वागताध्यक्ष मा.रेणुकताई वराडे, घनश्याम बोडखे, निमंत्रक मल्हारी खेडकर (जिल्हा अध्यक्ष अहिल्या नगर), युवक जिल्हाध्यक्ष अर्जुन वायभासे हे प्रयत्नशील आहेत.

# विहिरी घोटाळा प्रकरणी फक्त ग्रामसेवक निलंबित, इतर लोकांवर कधी होणार कारवाई

जालना । प्रतिनिधी

घनसावंगी पंचायत समिती मार्फत म.ग्रा.रो.ह.यो अंतर्गत पांदण रस्ते, शेततळे व सिंचन विहिरीमध्ये अनियमितता, गैरप्रकार करुन भ्रष्टाचार केल्याप्रकरणी संबंधितावर कायदेशीर कार्यवाही करण्यासाठी १४ ऑगस्टपासून उपोषण सुरू आहे याप्रकरणी फक्त ग्रामसेवकाला निलंबित करण्यात आलं यावेळी ग्रामसेवक यांना विचारले असता ते म्हणाले की ठराव वर तसेच एम आर ए जे स विहीर फायलीवर अज्ञात व्यक्तीने खाडाखोड करून यामध्ये मला गुतण्यात आलं तसेच ते म्हणाले की माझ्या सह्या नसताना वर कॉटर देण्यात आल्या याप्रकरणी गटविकास अधिकारी व विस्ताराधिकारी इतर कर्मचारी एम आर ईजस विहीर घोटाळा प्रकरणी जबाबदार आहे यांच्यावरील कारवाई होणे गरजेचे आहे.



यावेळी ग्रामसेवक म्हणाले की मी जर खडाखोड केली असती तर माझ्या सह्या घेणे गरजेचे होतं तसं का करण्यात आलं नाही म्हणून मी खडाखोड केला नाही या प्रकरणी माझा आव्हाल रिपोर्ट जिल्हा परिषद चे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देणार आहे. तसेच जिल्हा परिषद पंचायत विभागात उपमुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालयामध्ये मी बदली करून जाणार आहे आवाजामध्ये ऐकायला मिळत होतो. उपमुख्य कार्यकारी अधिकारी अंकुश चव्हाण उपोषण थांबण्यासाठी प्रयत्न केला असता उपोषण करते म्हणाली का कारवाई का केली तेचा लेखी अहवाल सादर करा नंतर मी उपोषण मागे घेतो अशी चर्चा झाली याप्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. यांनी चौकशी समितो गठित करुन चौकशी आज पर्यंत झाली नाही व कारवाई का केली त्याचा अहवाल मला देण्यात आला नाही असे उपोषण करते वाघमारे यांचे म्हणणं आहे

म.ग्रा.रो.ह.यो अंतर्गत विहिरीमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता, गैरप्रकार करुन कोटयावधी रुपयांचा भ्रष्टाचार केल्या प्रकरणी दोषींवर कार्यवाही करणे करिता तक्रार दाखल असताना सदरील प्रकरणात कोणतीही उचित कार्यवाही झाली नसल्यामुळे जि.प. समोर बेमुदत आमरण उपोषण सुरू केले आहे. सदस्यीय समिती गठित करुन चौकशी करून ७ दिवसात अहवाल सादर आदेश दिलेले आहेत. परंतु अद्याप पर्यंत चौकशी झाली नाही. उपरोक्त विषयी आपल्या स्तरावर तात्काळ कार्यवाही करुन संबंधितांवर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. पं.स. म.ग्रा.रो.ह. यो अंतर्गत झालेल्या कामांमध्ये अनियमितता, गैरप्रकार व भ्रष्टाचाराची तात्काळ चौकशी करुन संबंधितांवर निलंबनाची कार्यवाही करण्यात यावी. करता १४/०८/२०२४ रोजी जि.प. कार्यालया समोर बेमुदत आमरण उपोषण सुरू केले आहे

# कोट्यवधीचे विकास कामे पूर्ण करून सतीश घाटगे यांनी फोडले विकासाचे नारळ



अंबड । प्रतिनिधी

तालुक्यातील वडीकाळ्या गाव आणि गावाअंतर्गत येणारे लालसिंग नाईक तांडा व दुर्गा नाईक तांडा मुलभूत सोयी सुविधांपासून वंचित होते. या गावाला शासनाच्या माध्यमातून सतीश घाटगे यांनी समृद्ध केल आहे.

प्रामाणिक करदात्यांच्या पैशातून आणि महाराष्ट्र सरकारच्या सहकार्यातून या ठिकाणी १ कोटी १५ लाख रुपयांचा निधी सतीश घाटगे यांनी मिळवून दिला. त्यातून तयार झालेल्या रस्त्याचे गावकऱ्यांच्या साक्षीने सतीश घाटगे यांनी गुरुवारी लोकार्पण केले. तसेच नव्याने १ कोटी ३३ लाख रुपयांच्या शेत रस्ते खडीकरण व सभामंडपाच्या कामाचेही उद्घाटन केले. याप्रसंगी गावकऱ्यांचा उत्साह येणाऱ्या काळात परिवर्तनाची साक्ष देणारा होता. गावच्या विकासासाठी राजकारण बाजूला ठेवून एकत्र आलेल्या ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच आणि सदस्याचे घाटगे साहेबांनी अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमासाठी आसाराम चव्हाण , भगवान ढेबे, संदीप चव्हाण, गणेश नरवडे, गजानन रक्ताटे, योगेश गव्हाणे, नामदेव काळे , भरत तनपुरे, पंकज रक्ताटे, दिलीप राठोड, मनोज मुळे, शिवाजी राठोड आदींनी परिश्रम घेतले.

# रस्ता मागणीसाठी नागरिकांचे साचलेल्या पाण्यात बसून अर्धनग्न आंदोलन

## रस्त्याचा प्रश्न मार्गी न लागल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा दिला इशारा

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील बीड - अहिल्यानगर महामार्गापासुन ५ कि.मी अंतरावर १८०० लोकसंख्या असलेल कऱ्हेवडगाव गाव. १९७२ साली गावाच्या हद्दीत साठवण तलाव झाल्याने सिंचनाची सोय होऊन जिरायती क्षेत्र बागायत झाले. हा आनंद जास्त दिवस चेहऱ्यावर टिकला नाही. जमिनी संपादित झाल्याने राहाते घरे सोडून नागरिक विस्थापित होऊन शेतात राहण्यास गेले. सरकार रस्ता उपलब्ध करेल अशी भोळी अपेक्षा होती

परंतु रस्त्या अभावी आजही लोकांना हाल अपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. तिसऱ्या पिढीलाही या मधुन मोक्ष मिळाला नाही ... त्याच मरत यातना सहन कराव्या लागत आहे. एकीकडे आपला देश चंद्रावर, मंगळावर मोहिम काढत आहे याचा खूप आनंद



होत आहे परंतु आजही या वस्त्या वर तीन चाकी रिक्षा जाऊ शकत नाही हे पण दुर्दैव आहे. शालेय विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणावर हाल होत आहेत, गरोदर महिला, वयोवृद्ध नागरिक, यांना दवाखान्यात घेऊन जायचे असल्यास दोन -तीन कि.मी बैलगाडी किंवा झोळी करून घेऊन जावं लागत. पक्का रस्ता व्हावा यासाठी देशाचे पंतप्रधान, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पालकमंत्री यांच्याकडे पत्राद्वारे मागणी करूनही त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. रस्त्याचा प्रश्न मार्गी लागत नाही यास आजी-माजी लोकप्रतिनिधी जबाबदार आहेतच ? पण आमचे मीठ आळणी तर नाही ना असे वाटू लागले आहे... केल्याने होते रे आदि केलेची पाहिजे...... म्हणत नागरिकांनी भारताच्या स्वातंत्र्य दिनाच्या दि. १५ ऑगस्ट रोजी सकाळी ११.००वाजता गावचे माजी सरपंच नवनाथ नागरगोजे, माजी उपसरपंच बाळासाहेब नागरगोजे, इंजिनिअर आप्पासाहेब नागरगोजे, नारायण नागरगोजे (मुकादम) यांनी रस्त्यावरील खड्ड्यात साचलेल्या पाण्यात बसून अर्ध नग्न आंदोलन केले. महसूल कर्मचारी छाया मेश्राम यांनी आंदोलकांचे लेखी निवेदन स्वीकारले. पोलिस शिपाई बब्रूवाण वाणी उपस्थित होते. बीड-अहिल्यानगर - ५६१ हा महामार्ग गावच्या शिवे पासुन हाकेच्या अंतरावरून गेला आहे परंतु नागरिकांना जाण्या-येण्यासाठी कच्चा अथवा पक्का रस्ता नसल्यामुळे नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

गांधणवाडी-आंधळेवाडी फाटा ( ५६१ ) ते नागरगोजे वस्ती-सांडवावस्ती-आठेगावपुठा, या वस्त्या गाव अथवा इतर कोणत्याही मुख्य रस्त्याला अद्याप पर्यंत कच्च्या अथवा पक्क्या रस्त्याने जोडण्यात आलेल्या नाहीत येथील नागरिकांना गावाकडे अथवा इतरत्र जाण्या येण्यासाठी रस्ता उपलब्ध नसल्यामुळे मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागत आहे . आमच्या या मागणीची दखल घेत मायबाप सरकारने रस्त्याचा प्रश्न मार्गी लावावा ही अपेक्षा नागरिकांनी माध्यमाशी बोलताना व्यक्त केली. यावेळी सरपंच परिवंत गायकवाड, राम सांगळे, अंबादास नागरगोजे, आत्माराम नागरगोजे, रायचंद पवार ,जालिंदर नागरगोजे, सुभाष नागरगोजे, प्रशांत नागरगोजे , हनुमान नागरगोजे,गहिनीनाथ नागरगोजे, सोमीनाथ नागरगोजे, भास्कर नागरगोजे, अंकुश नागरगोजे, दादासाहेब नागरगोजे,गुलचंद नागरगोजे, कुंडलिक नागरगोजे,आजिनाथ नागरगोजे, गहिनीनाथ नागरगोजे, आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


**जाहीरनामा**

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय केज,जि.बीड**

**एम ए जी विभाग**

ई-मेल KAIJTAHSILDAR@GMAIL.COM

दुरध्वनी क्र ०२२४५-२५२६४५

**क्रं.२०२४/एमएजी/कावि/१०९२ दिनांक:- २५.०७.२०२४**

सर्व जनता मौजे शे. गांजी ता. केज यांना जाहीर केले जाते की, शे. गांजी येथील जन्म पावलेला इसम नामे चंद्रकला पि. भाऊसाहेब जाधव हिचा स्वतःचा जन्म दिनांक ०३/०४/१९६२ रोजी झालेला असुन व जन्म नोंद आदेश ग्रामपंचायत शे. गांजी यांना देणे बाबत चंद्रकला पि. भाऊसाहेब जाधव यांनी स्वतः या कार्यालयास दि. ०४.०७.२०२४ रोजी अर्ज सादर करुन सोबत ग्रामपंचायत शे. गांजी यांचे नोंद नसल्याचे प्रमाणपत्र व १०० रुपयाचे स्टॅम्पवर शपथपत्र सादर करुन ग्रामपंचायत शे. गांजी ता. केज यांना त्यांच्या स्वतःची जन्म नोंद घेणे बाबत आदेश देणेस विनंती केली आहे.

२/- चंद्रकला पि. भाऊसाहेब जाधव हिचा जन्म नोंद घेणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास जाहीरनामा प्रसिध्दी पासुन १५ दिवसाचे आत लेखी आक्षेप व त्या पृष्ठायर्थ योग्य तो पुरावा या कार्यालयास समक्ष दाखल करावा. मुदती नंतर आलेल्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व ग्रामपंचायत कार्यालय शे. गांजी ता. केज यांना जन्म नोंद घेणेचा आदेश देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरित/-

**कार्यकारी दंडाधिकारी, केज**

प्रतिलीपी

तलाठी सजा गोटेगांव यांना जाहीरनामा प्रसिध्दीस्तव देण्यात येवुन सुचीत केले जाते की, जाहीरनामेची प्रसिध्दी ग्राम पंचायत नोटीस बोर्डवर तात्काळ करुन ३ दिवसाचे आत प्रसिध्दी पंचनामेसह अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

# कोलकाता प्रकरणी आष्टीत २४ तास बाह्य रुग्ण सेवा बंद

## आष्टी शहरात रॅली काढून केला निषेध

**आष्टी । प्रतिनिधी**

कोलकाता येथील आरजी कार मेडिकल कॉलेज येथे एका तरुण पोस्ट-ग्रॅज्युएट चेस्ट मेडिसिनच्या विद्यार्थीनीचा ९ ऑगस्ट रोजी

ड्युटीवर असताना क्रूरपणे बलात्कार करुन हत्याा करण्यात आली. या भयावह घटनेने वैद्यकीय समुदाय आणि देशाला धक्का बसला असून याच्या निषेधार्थ निवासी डॉक्टरांनी आधीच संप सुरू केला असून इंडियन मेडिकल असोसिएशनने देशभरात आंदोलन आणि निषेध मोर्चे काढले असून याच पार्श्वभूमीवर इंडीयन मेडिकल असोसिएशनचे व आष्टी तालुका डॉंक्टर्स असोसिएशनचे सर्व वैद्यकीय सेवा बंदीचे आवाहन १७/०८/२४ सकाळी ६ वाजल्यापासून ते १८/०८/२४ सकाळी ६ वाजेपर्यंत अत्याावश्यक सेवा वगळता बाह्य रुग्ण सेवा २४ तास बंद ठेऊन

आष्टी तालुका इंडीयन मेडिकल डॉक्टर असोसिएशन कोलकाता प्रकाराचा जाहीर निषेधार्थ मोर्चा काढत जाहीर निषेध केला आहे.

आष्टी शहर व तालुक्यातील या गुन्ह्यातील पीडितांच्या समर्थनार्थ आणि चालू असलेल्या हिंसाचार विरोधात इंडियन मेडिकल असोसिएशन अत्याावश्यक व अपात्कालीन सेवा सुरू राहतील.पण नियमित बाह्यरुग्ण तपासणी आणि शस्त्रक्रिया बंद ठेवण्यात येतील.यावेळी आष्टी तालुका डॉक्टर असोसिएशनचे अध्यक्ष डॉ.विलासराव सोनवणे,कडा डॉक्टर अध्यक्ष डॉ.पंडीत खिलारे,वैद्यकीय अधिक्षक डॉ.राहुल टेकाडे, डॉ. शिवाजी राऊत, डॉ.काकडे,



डॉ.पोकळे, डॉ.नदिम शेख, डॉ.प्रकाश झांजे, डॉ.अभय म्हस्के ,डॉ. लाड,डॉ.सचिन टेकाडे,डॉ.संदिप टेकाडे,डॉ. चौधरी, डॉ.शेंडगे, डॉ.पिसाळ, डॉ.ढेरे पाटील,डॉ. अजहर बेग, महीला डॉ.शैलजा गर्जे,डॉ.ज्योती आकोलकर, डॉ.वर्षा राऊत,डॉ. रिजवाना शेख,जिजाऊ ब्रीगेड अध्यक्षा सुवर्णा गिर्हे ,सौ निंबोरे यांच्यासह केमिस्ट बांधव,लॅब टेक्निशियन आदी उपस्थित होते. आष्टी शहरात डॉक्टर असोसिएशनच्यावतीने निषेध रॅली काढली होती.यामध्ये डॉक्टर,महिला नर्सिंग विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित झाले होते तर निषेधार्थ पो. निरीक्षक शिंदे यांना निवेदन देण्यात आले.



मुंबई : षणमुखाणंद सभागृह सायन मुंबई येथे राज्यस्तरीय महाविकास आघाडी प्रमुख पदाधिकारी मेळाव्यास जिल्हाध्यक्ष परमेश्वर सातपुते उपस्थित राहीले. यावेळी शिवसेना पक्षप्रमुख सन्माननीय उद्धवजी ठाकरे साहेब, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते शरदचंद्रजी पवार साहेब,व काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले व युवा सेनेचे प्रमुख आदित्याजी ठाकरे साहेब, खासदार संजय राऊत, राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील साहेब यांनी उपस्थित महाविकास आघाडीच्या पदाधिकारी यांना मार्गदर्शन केले व पुन्हा एकदा महाराष्ट्रामध्ये महाविकास आघाडीचे सरकार येणार आसल्याचा विश्वास व्यक्त केला याप्रसंगी शिवसेना नेते विनायक राऊत साहेब, शिवसेना नेते चंदकांत खैरे साहेब , उपनेत्याा सुष्माताई अंधारे, संपर्क प्रमुख परशुरामजी जाधव साहेब, सहसंपर्कप्रमुख लक्षराजजी सानप साहेब, अमोल भैय्या किर्ती कर शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर, सहकारी जिल्हा प्रमुख रताकर आप्पा शिंदे सह धर्मेश सपकाळ इत्याादी उपस्थित होते..!!

## कोलकता येथील घटनेच्या निषेधार्थ धारूर शहरातील डॉक्टरांचा कडकडीत बंद; तहसिलदारला निवेदन

किल्लेधारूर (प्रतिनिधी)

९ ऑगस्ट २०२४ रोजी, आरजी कार मेडिकल कॉलेज, कोलकाता येथे एका तरुण पोस्ट-ग्रॅज्युएट चेस्ट मेडिसिनच्या विद्यार्थीनीचा ड्युटीवर असताना क्रूरपणे बलात्कार करुन हत्याा करण्यात आली.

या घटनेच्या निषेधार्थ धारूर डॉक्टर असोशीयशन चे वतीने चौवीस तास वैद्यकीय सेवा बंद ठेवण्याचा मेडिकल डॉक्टर असोसिएशनचा ठराव करून धारूर शहरातील रुग्णसेवा बंद ठेवून डॉक्टर मंड्ळीचे संरक्षणा साठी कडक कायदा करावा या मागणी साठी तहसीलदारला निवेदन ही देण्यात आले.



कोलकत्ता येथील महीला डॉक्टर वर अत्याचार करून तिची हत्याा केलेच्या निषेधार्थ देशव्यापी बंद पुकारला होता. धारूर येथील डॉक्टर असोशीयशन चे वतीने कडकडीत बंद पाळण्यात आला. शहरातील सर्व रुग्नालये बंद होती यामुळे रुग्नाची माञ गैरसोय झाली धारूर डॉक्टर असोशीयशन चे वतीने तहसील कार्यालयात निवेदन देऊन या घटनेचा निषेध करून डाक्टराचे संरक्षणा साठी कडक कायदा करण्याची मागणी करण्यात आली यावेळी शहरातील डॉक्टर मंडळी मोठ्या संख्येने उपस्थीत होते.

## कोळपिंप्रीत कर्जबाजारी शेतकऱ्याची आत्महत्या

किल्लेधारूर । प्रतिनिधी

तालुक्यातील कोळपिप्री येथील शेतकरी नृसिंह नारायण सांवत वय ५० वर्ष यांनी शेतीचे कर्ज झाल्याने शेतातील लिंबाचे झाडाला गळफास घेऊन आत्महत्याा केली या प्रकरणी धारूर पोलीस स्टेशन मध्ये आकस्मातमृत्युाची नोंद करण्यात आली आहे पुढील तपास पोलीस करत आहे.

तालूक्यातील कोळपिंप्री येथिल शेतकरी नृसिंह नारायण सांवत वय ५०वर्ष यांचे कडे धारूर येथील पेठ विभागातील एस बी आय व कोळपिंप्री सेवा सहकारी सोसायटी यांचे पिक कर्ज होते शेतीत दिवसराञ मेहनत करून ही कर्ज फिटत नसल्याने नृसिंह सांवत या

शेतक-याने जिवनास कंटाळून खोडस रोड वरील आपले शेतात लिब्राचे झाडाला गळफास घेऊन शुक्रवारी १६आगस्ट रोजी दुपारी आत्ामहत्याा कली त्त्याांा पश्चात पती दोन मुली, एक मुलगा असा परीवार आहे या तरूण शेतक-याचे निधना मुळे सर्वञ हळहळ व्यक्त केली जात होती. धारूर पोलीस स्टेशन मध्ये आकस्मात मृत्युाची नोदकरण्यात आली असून पुढील तपास पोलीस करत आहे.

## खा.सोनवणे यांना परळीच्या घटक पक्षाचा विसर; काँग्रेस पदाधिकाऱ्यांत नाराजी

**परळी प्रतिनिधी**

बीड लोकसभेत बजरंग सोनवणे यांना निवडून आणण्यासाठी महाविकास आघाडी म्हणून काँग्रेस पक्षानी आपला आघाडीचा धर्म पाळत मोठा विजय मिळवून दिला.आज तीन महिने होतायत बजरंग सोनवणेनी कधी साधा संपर्क केला शिवाय काल शिवस्वराज्य यात्रे निमित्ताने परळी शहरात आले पण आघाडीच्या कुठल्याही नेते पदाधिकारी, कार्यकर्त्यांना साधा संपर्क तर सोडाच किंवा काँग्रेस कार्यालयाला भेटण्याची सदेच्छा न दाखवल्याने आघाडीतील प्रमुख पक्ष असलेल्या काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी नाराजी व्यक्त करत असल्याचे काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष बहादुरभाई यांनी सांगितले.



लोकसभा निवडणुकीत खासदार बजरंग बाप्पा सोनवणे यांना निवडून आणण्यासाठी विरोधी उमेदवाराची परळी मतदार संघात प्रचंड दहशत असताना काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी

जीवाची रान करुन कुढल्याही मनुष्याला बळी न पडता न डगमगता बजरंग बप्पाचा विजय खेचून आणण्यासाठी प्रयत करत असलेल्या

परळी शहर काँग्रेसकडे पाठ फिरवली ना कुढला मॅसेज,ना कुढला फोन केला नाही.राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाची काल शिवस्वराज्य यात्रा निमित्ताने खा.सोनवणे आले होते. परळीत येऊन सुद्धा काँग्रेसच्या नेते पदाधिकाऱ्यांची भेट सुद्धा घ्यावा घ्यावीशी वाटली नाही किंवा त्याांच्या ऑफिसला सदिच्छा भेट सुध्दा देण्याचे टाळले असल्याने काँग्रेस पक्षाच्या नेते कार्यकर्त्यांत प्रचंड नाराजीचा सूर उमटला असल्याचे परळी शहराध्यक्ष बहादुरभाई यांनी सांगितले.

## रामगिरी महाराज यांच्यावर तात्काळ गुन्हा दाखल करून अटक करा

पाटोदा । प्रतिनिधी

दोन धर्मियांमध्ये जातीय तेढ निर्माण करुन धार्मिक कलह , द्वेष पसरवण्याचा प्रयत केल्याप्रकरणी रामगीरी गुरु नारायण गिरी महाराज यांच्यावर गुन्हा दाखल करुन तातडीने अटक करण्यात यावे . अशी मागणी सकल मुस्लिम समाज पाटोदा यांच्या वतीने पाटोदा पोलीस स्टेशन यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे . यावेळी मुस्लिम समाजातील विविध सामाजिक संघटनांचे कार्यकर्ते उपस्थित होते . याविषयी दिलेल्या



सकल मुस्लिम समाज पाटोदा यांची मागणी

निवेदनात नमूद केले आहे की , रामगीरी गुरु नारायण गिरी महाराज यांनी मौजे पंचाळे , ता . सिन्नर , जि . नाशिक या ठिकाणी सप्ताहा दरम्यान प्रवचनामध्ये उपस्थित जनसमुदायासमोर मुस्लिम धर्माची व धर्मगुरुची प्रतिमा मलीन होईल , असे जाणीवपूर्वक प्रवचन केले आहे . ज्या त्याने म्हटले आहे की , भारतात एक कोटीपेक्षा अधिक मुस्लिमांनी इस्लाम सोडला आहे . दहा - वीस वर्षे ज्यांनी मौलाना म्हणून काम केले आहे . त्याांनी इस्लामचा सुक्ष्म अभ्यास केला असता , त्याांना यात अन्याय - अत्याचाराशिवाय काहीही आढळून न आल्याने त्याांनी इस्लाम धर्म सोडून दिला आहे . मुहम्मद पैगबर यांनी वयाच्या पन्नासाव्या

◀◀ पान ३ वर

## सोयाबिन, कापसाचे सरसकट अनुदान द्या -भाई ॲड.नारायण गोले पाटील

**माजलगाव । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांच्या शेतमालाला कीफायत शिर हमी भावाची मागणी गेल्या अनेक दिवसांपासून प्रलंबित असताना त्याावर सकारात्मक पणे शासनाने अद्यापही विचार केलेला नसून हमी भावाच्या नावाखाली शेतकऱ्याची फसवणूक करून तुटपूंजा भाव शेतमालाला दिला जात असून याबाबत शेतकऱ्यांनी सरकारच्या विरोधात आक्रमक होऊ नये यासाठी शासन शेतकऱ्यांच्या तोंडाला पाणी पुसण्याचे काम नेहमीच करत असते, त्याच धर्तीवर

शासनाने गतवर्षीच्या सोयाबीन, कापूस



उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी पाच हजार रुपये अनुदान देण्याची घोषणा केली असून यासाठी ई पीक पाहणी ची यादी ग्राह्य धरण्यात येईल असे सांगितले असून अनेक शेतकऱ्यांनी ई पीक पाहणी करूनही त्यांचे नावे सदरील यादीत आलेली

◀◀ पान ३ वर

## जिल्हाधिकारी यांच्या हस्ते पुरवठा निरीक्षक बी. बी. कचरे यांचा उत्कृष्ट कर्मचारी म्हणुन गौरव

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

परळी वैजनाथ तहसील कार्यालयातील अव्वल कारकून तथा पुरवठा निरीक्षक बी. बी. कचरे यांचा नुकताच स्वातंत्र्य दिनानिमित्त बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्याहस्ते उत्कृष्ट कर्मचारी म्हणुन गौरव करण्यात आला.

जिल्हा अधिकारी कार्यालय बीड यांच्या मार्फत दिला जाणारा उत्कृष्ट कर्मचारी पुरस्कार/गौरव २०२४ श्री . बी. बी. कचरे, पुरवठा निरीक्षक तहसिल कार्यालय परळी वैजनाथ यांना जिल्हा अधिकारी अविनाश पाठक यांच्या हस्ते पुरस्कार देवुन गौरव करून सत्कार करण्यात



आला. अंबाजोगाई येथे नुकतेच संपन्न झालेल्या स्वातंत्र्य दिनाच्या ध्वजारोहण समारंभात पुरवठा निरीक्षक बी. बी. कचरे यांचा त्याांनीं मागील कांहि वर्षामध्ये प्रशासकीय सेवेमध्ये केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल जिल्हाधिकारी यांनी त्यांचा उत्कृष्ट कर्मचारी म्हणुन शाल, श्रीफळ व स्मृतीचीन्ह देउन गौरव करण्यात आला. यावेळी निवासी जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, सर्व तहसीलदार, नायब तहसीलदार व अधिकारी कर्मचारी उपस्थितीत होते.

## कोलकत्ता येथे महिला डॉक्टरवर अत्याचार करून निघृण हत्या करणाऱ्या नराधमास कठोर शासन करावे- राजकिशोर मोदी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**कोलकत्ता येथील डॉ मौमिता देबनाथ यांच्यावर काही क्रूरकर्मा नराधमांनी अमानुष छळ करून त्यांचा अत्यंत निष्ठुरपणे खून करणाऱ्या नराधामास कठोरात कठोर शासन करावे अशा मागणीचे निवेदन राजकिशोर मोदी व मित्र मंडळ यांनी नुकतेच उपजिल्हाधिकारी अंबाजोगाई यांना दिले. वरील मागणीचे निवेदन सादर करताना राजकिशोर मोदी यांच्या सोबत माजी नगरसेवक महादेव आदमाणे, कचरूलाल सारडा,संतोष शिनगारे, अंकुश हेडे, अकबर पठाण, दत्ता सरवदे, सय्यद ताहेर, शेख मुक्तार,रफिक गवळी,**



**शरद काळे आकाश कऱ्हाड यांच्यासह अनेक सहकारी उपस्थित होते.**

दिनांक ९ऑगस्ट २०२४ रोजी कोलकत्ता येथे आर.जी. कार मेडीकल कॉलेजमध्ये कार्यरत असणा-या महिला डॉक्टरवर नराधमांनी अत्याचार करून त्या डॉक्टरची अमानुष व क्रूरपणे हत्या केलीआहे. या घटनेचा जाहीर निषेध करून असे कृत्य करणा-या नराधमास कठोरात कठोर शिक्षा होऊन त्यांना फाशीची शिक्षा देण्यात यावी अशी मागणी मा उपजिल्हाधिकारी अंबाजोगाई यांना दिलेल्या निवेदनाद्वारे करण्यात आली. त्याचबरोबर राजस्थान मध्येही एका परिचरिकेवर अत्याचार करून त्यांचीदेखील हत्या करण्यात आली. या दोन्ही प्रकरणातील आरोपीना कडक शासन करून त्यांना तात्काळ फाशीची शिक्षा सूनवावी. या घटनेची गंभीरपणे दखल घेऊन देशातील सर्व डॉक्टर व कर्मचारी यांनी घेतल्याने त्यांनी अनेक ठिकाणी काम बंद तसेच विविध प्रकारची आंदोलने करण्यात येत आहेत. सरकारी आरोग्य व्यवस्थेत कार्यरत डॉक्टर परिचारिका आणि इतर आरोग्य सेवा कर्मचा-यांच्या सुरक्षा व इतर गरजांकडे सरकारच्या उदासीन धोरणामुळे आणि असंवेदनशीलतेमुळे अशा घटनांना पोषण मिळत आहे. त्यामुळे कोलकत्ता उच्च न्यायालयाच्या आदेशाची कडक अंमलबजावणी करून गुन्हेगारांना कठोर शिक्षा व्हावी, तसेच आरोग्य सेवकांना कडक संरक्षण मिळावे. जेणेकरून भविष्यात अशा घटनांना वाव मिळून त्या पुन्हा पुन्हा घडणार नाहीत. या घटनेच्या विरोधात स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात व वैद्यकीय महाविद्यालयात डॉक्टरांनी आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनास देखील राजकिशोर मोदी यांनी जाहिर पाठिंबा दर्शविला आहे. त्याचबरोबर अशा अप्रिय घटनांना आळा घालण्यासाठी कठोर कायदा करून या अप्रिय घटना टाळाव्यात अशी मागणी राजकिशोर मोदी यांनी निवेदना द्वारे केली आहे.

## जकी बाबा सोशल वेलफेयर फाऊंडेशनतर्फे रक्तदान शिबीर संपन्न

### २३९ रक्तदात्याने केले रक्तदान; रक्तदान स्थळी मराठा योध्दा मनोज जरांगे पाटलांची भेट

**माजलगाव । प्रतिनिधी**

भारताच्या ७८ व्या स्वतंत्र दिवसाचे औचित्या साधुन दर वर्षी प्रमाने या वर्षी ही समाजसेवक जकी बाबा सोशल वेलफेअर फाऊंडेशनच्या ४ थे रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते.या वेळी २३९ जणांनी रक्तदान करत आपला स्फुर्त प्रतिसाद नोंदवला.

या वेळी सुत्र संचालन माजेद खान यानी केले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी खलील पटेल (अमीर सहाब) हे होते तर



उद्घाटक डॉ श्रेयश देशपांडे हे होते प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगराध्यक्ष सहाल चाऊस,खुर्शीद नाईक,खलील पटेल,नासेर पठाण, नारायण डक, अजहर नाईक, सयद भाई,ॲड नासेर खान,सय्यद लतीफ,मुजमील पटेल,मोबीन खान, धमानंद साळवे, बबनराव सरवदे, रफीक ताबोळी, मजिद भाई तर यावेळी मराठ्यांच्या संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांच्यासह जयसिंह सोळंके व डॉ लोढा सर,डॉ आमेर सर यांनी रक्तदान शिबीरला भेट दिली.

यावेळी फाऊंडेशनचे अध्यक्ष शेख शौकत यांनी प्रास्ताविक केले त्याांनी फाऊंडेशने या वर्षी केलेले कामा बदल माहिती दिली त्याने सांगितले की फाऊंडेशनच्या जकी बाबा ऐम्बुलेंस द्वारे २१० रुग्णाना सेवा देण्यात आली व ५० गरीब रुग्णाना मोफत सेवा देण्यात आली व तसेच फाऊंडेशन तर्फे काही रुग्णाना मोठ्या दवाखान्यात सर्जरीसाठी मुंबई, पुणे, औरंगाबाद, शिर्डी येथे पाठवुन सर्जरी करण्यात आले व दवाखान्याच्या खर्चा साठी काही प्रमाणात मदत करण्यात आली तर काही गरीब परिवारन वर्षभर दर महीन्याला किराणाकिट देण्यात आले. फाऊंडेशन शिक्षणासाठी पण गरिब गरजू मुलांना मदत करते, गोरगरीब परिवारना विवाह साठी मदत करण्यात आली. काही पारिवारिक भाडंण

◀◀ पान ३ वर

## श्रेयस व प्रेयस याची जाणीव पालकांनी मुलांना करून द्यावी- पोलीस उपनिरीक्षक योगेश शिंदे यांचे प्रतिपादन

**परळी । प्रतिनिधी**

येथील कै .लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात नुकताच पालक मेळावा संपन्न झाला.

या मेळाव्यात प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शन करत असताना परळी शहर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक मा.योगेश शिंदे साहेब यांनी ''श्रेयस व प्रेयस यांची जाणीव करून देण्याची मुख्य जबाबदारी पालकांची असल्याचे ''मत या प्रसंगी व्यक्त केले.यावेळी सखोल मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांसाठी अनेक




क्षेत्र खुली आहेत त्याा क्षेत्रातील संधीचा वापर करून घ्यावा व पालकांनी आपल्या पाल्याला त्याा क्षेत्राात संधी उपलब्ध करून देण्यासाठी विशेष जबाबदारी पार पाडावी अशी भूमिका त्याांनी यावेळी व्यक्त केली.

पालक मेळाव्यात सौ. सातपुते ,लालाखान पठाण ,श्री काबराजी यांनी प्रातिनिधिक स्वरूपात पालकांचे मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सन्माननीय सचिव

◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# सावत्र भावांना संधी येईल तेव्हा जोडा दाखवा मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचं बहिणींना आवाहन

## पुण्यात 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'चा शानदार शुभारंभ

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील बालेवाडी येथे लाडकी बहीण योजनेचा राज्यस्तरीय शुभारंभ पार पडला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंसह दोन्ही उपमुख्यमंत्री अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांच्यासह अन्य नेत्यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला आहे. या कार्यक्रमावेळी जमलेल्या बहिणींना संबोधित करताना राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी खोडा घालायला आलेल्या सावत्र भावांना संधी येईल तेव्हा जोडा दाखवा असं आवाहन केलं आहे.

या योजनेवरती विरोधक म्हणाले लाडक्या भावाचं काय. यांना कधी तरी लाडक्या भावावर प्रेम होतं का. असतं तर ते सोडून गेले असते का. पण आम्ही लाडक्या भावांनाही शिष्यवृत्ती द्यायला सुरुवात केली आहे. महिलांना तीन गॅस सिलिंडर मोफत देण्याचा निर्णय आमच्या सरकारने घेतला आहे. सावत्र कपटी भावांवर मात करून आलो आहे. फक्त त्यांना लक्षात ठेवा. त्यांना योग्यवेळी जागा दाखवा. भीक देता का, विकत घेता का, लाच घेता का असे शब्द काढायला लागले. या बहिणींबद्दल असं बोलताना




जनाची नाही तरी मनाची वाटायला हवी होती. ते या योजनेच्या विरोधात कोर्टातही गेले. कोर्टाने त्यांची याचिका फेटाळली आणि बहिणींच्या बाजूने निकाल दिला. खोडा घालायला आलेल्या सावत्र भावांना संधी येईल तेव्हा जोडा दाखवा, सोन्याचा चमचा घेऊन आलेल्यांना दीड हजारांचे महत्व कळणार आहे का? असंही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी म्हणाले आहेत. तुम्हाला वंदनही करतो. तुम्ही इतक्या मोठ्या संख्येने या कार्यक्रमाला आलात. मी अनेक बहिणींच्या डोळ्यात आनंदाश्रू पाहिले आहेत. सरकारच्या, भावांच्या प्रती आदर पाहिला आहे. आता आणखी दुसरं काय पाहिजे. तुमच्या जीवनात सुखाचे दिवस यावेत हीच आमची प्रामाणिक इच्छा आहे. या योजनेबद्दल सर्वांशी चर्चा झाली. त्याची अंमलबजावणी कशी करायची. आर्थिक वर्षाचं नियोजन कसं करायचं हे पाहत होतो. तुम्ही प्रपंच चालवताना कसरत करता, तसं सरकार चालवताना आम्हाला कसरत करावी लागते. पायभूत सुविधांसाठी कर्ज घ्यावं लागतं, पगार असतो, पेन्शन असतं या सर्व गोष्टी करायच्या असतात. पण आमच्या बहिणींना काही तरी द्यायचं होतं. म्हणून ही योजना जाहीर केली, असंही शिंदे यावेळी म्हणाले. आपल्याला सातत्य टिकवायचं आहे. ते तुमच्या हातात आहे. हे सातत्य टिकवतं असताना पुढच्या पंचवार्षिकला पुन्हा महायुतीला संधी द्या, पुन्हा आम्हाला पाठवळ द्या, आम्ही तुमच्या खात्यात पुन्हा एकदा ९० हजार रूपये देण्याचं काम करू. आम्ही शब्दांचे पक्के आहोत, आम्ही वेळ मारून नेणारे नाहीत. जे बोलतो ते करतो, असंही अजित पवार यावेळी बोलताना म्हणाले. अख्खा महाराष्ट्र लाडक्या बहिणीमय झाला आहे, आमच्या मनात काही वेगळी भावना नव्हती अर्थ संकल्प मांडताना आमची बहीण, महिला सक्षम झाली पाहिजे असं आम्हाला वाटतं होतं. विरोधक कारण नसताना टीका करत आहेत. विरोधक फक्त बहिणीकडे लक्ष दिलं असं म्हणतात, मात्र भावाकडेही आम्ही लक्ष दिले आहे. यापुढे कुणीही लाईट भरू नये, कोण तुमची लाईट कट करायला येत तेच बघतो, हे भावासाठी केलं आहे. काहीजण कोर्टात गेले, पण कोर्टात टिकलं नाही, मग काय करायच असं विरोधकांना वाटायला लागलं असा हल्लाबोल अजित पवारांनी विरोधकांवर केला आहे.

# एकही पात्र महिला योजनेपासून वंचित राहणार नाही-अजित पवार

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यातील महिलांना अधिक सक्षम, सबल करण्यासाठी त्यांना मान, (इरश्रशुरवळ)सन्मान प्रतिष्ठा मिळवून देण्याकरीता अर्थसंकल्पात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू करण्यात आली. या योजनेला माता-भागिनींकडून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. यापुढेही या योजनेत सातत्य राहणार असून एकही पात्र महिला या योजनेपासून वंचित राहणार नाही, असे उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले.



आजपर्यंत १ कोटी ३ लाख रुपये माता-भागिनींच्या बँक खात्यात जुलै व ऑगस्ट महिन्याचे मिळून ३ हजार रुपये जमा करण्यात आले आहे. या महिलांच्या चेहऱ्यावर आनंद, समाधान, हसू दिसून येत आहे. भाऊबीज सणानिमित्ताने ओवाळणी म्हणून भेट दिली आहे. माता-भगिनी जीवन जगताना त्यांच्या आशा अपेक्षा असतात परंतु स्वतःचे हीत बाजूला ठेवून कुटुंबाच्या भल्याकरीता त्या काम करीत असतात. या योजनेच्या माध्यमातून त्यांच्या आशा-अपेक्षापूर्तीसाठी काम करण्यात येत आहे. यापुढेही या योजनेत सातत्य राहणार असून एकही पात्र महिला या योजनेपासून वंचित राहणार नाही, असे त्यांनी पवार यांनी सांगितले.

राज्याच्या अर्थसंकल्पात मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, मुलींना मोफत व्यवसायिक शिक्षण अशा विविध योजना सुरू करण्यात आल्या आहेत. राज्याच्या हिताकरीता बेरोजगारी कमी करण्यासाठी, सर्व सामान्य नागरिकांचे जीवन सुखकर करण्यासाठी, मेट्रोचे जाळे निर्माण करण्यासाठी केंद्र व राज्य शासन मिळून काम करीत असून नागरिकांनी विकासकामांना सहकार्य करावे, असे आवाहन पवार म्हणाले.

## नीरा डाव्या कालव्यामध्ये आढळला महिलेचा मृतदेह

**वालचंदनगर । प्रतिनिधी**

गोतोंडी (ता.इंदापूर) येथील पार्वती विजय मुलमुले (वय ३८) यांचा मृतदेह नीरा डाव्या कालव्यामध्ये आढळला आहे. त्याची पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

वालचंदनगर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १५ ऑगस्ट रोजी रात्री दहापासून पार्वती मुलमुले अचानक घरातून निघून गेल्या होत्या. शुक्रवारी (ता. १६) सकाळी अकराच्या सुमारास त्यांचा मृतदेह एका लाकडाला अडकलेला आढळला. याप्रकरणी विजय विठ्ठल मुलमुले (वय ४३) यांनी वालचंदनगर पोलिस ठाण्यात खबर दिली आहे. अधिक तपास वालचंदनगर पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक विक्रम साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हवालदार दादासाहेब डोईफोडे करीत आहेत.

## भांडणात मध्यस्थी करणाऱ्या महिलेचा विनयभंग

**पुणे । प्रतिनिधी**

आईशी सुरू असलेल्या भांडणात मुलीने मध्यस्थी केली. मात्र एकाने तिला अश्लिल बोलून तिचा विनयभंग केला. ही घटना बुधवारी (दि. १४) सकाळी नऊ वाजताच्या सुमारास घरकुल, चिखली येथे घडली.

ज्ञानेश्वर रामभाऊ महानोर (वय ४५, रा. ज्ञानज्योती सोसायटी, घरकुल, चिखली) असे गुन्हा दाखल झालेल्या आरोपीचे नाव आहे. याबाबत ३८ वर्षीय महिलेने शुक्रवारी (दि. १६) चिखली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बुधवारी सकाळी नऊ वाजताच्या सुमारास आरोपी ज्ञानेश्वर हा फिर्यादी यांच्या आईशी मोठमोठ्याने भांडण करीत होता. तेव्हा फिर्यादी या भांडण सोडविण्यासाठी गेल्या असता आरोपी ज्ञानेश्वर याने तू माझया नादाला लागू नको, नाहीतर तुला सोसायटीत मारेल. तसेच फिर्यादीशी अश्लिल बोलून त्यांचा विनयभंग केला. चिखली पोलीस याबाबत अधिक तपास करीत आहेत.

## 'बर्गर किंग'कडून लोगो आणि नावाची फसवणूक नाही! जिल्हा न्यायालयाचा निकाल

**पुणे । प्रतिनिधी**

'बर्गर किंग कॉर्पोरेशन' देशात सुमारे ३० वर्षांपासून लोगो वापरत नव्हते. या काळात पुण्याचे 'बर्गर किंग' सातत्याने आपली सेवा देत होते. त्यामुळे 'बर्गर किंग' या व्यवसाय चिन्हाचा (लोगो) आणि नावाची कुठलीही फसवणूक न करता कायदेशीर आणि प्रामाणिकपणे वापर करत आहे,' असा निर्वाळा देत अमेरिकेच्या 'बर्गर किंग कॉर्पोरेशन'ने कॅम्पमधील 'बर्गर किंग' विरोधात दाखल केलेला दावा निकाली काढला आहे.

येथील लोकप्रिय 'बर्गर किंग' या खाद्यपदार्थ विक्रीच्या हॉटेलने अमेरिकेच्या 'बर्गर किंग कॉर्पोरेशन' विरुद्धची न्यायालयीन लढाई जिंकली आहे. समान नावावरून या दोघांमध्ये वाद होता. अमेरिकेच्या 'बर्गर किंग'ने दाखल केलेल्या या खटल्यात जिल्हा न्यायाधीश सुनील वेदपाठक यांनी येथील 'बर्गर किंग'च्या बाजूने निकाल दिला.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, अमेरिकेच्या 'बर्गर किंग कॉर्पोरेशन'ने आपले




प्रतिनिधी पंकज पाहुजा यांच्यामार्फत कोरेगाव पार्क आणि लष्कर भागातील 'मेसर्स बर्गर किंग'चे मालक अनाहिता आणि शापूर इराणी यांच्याविरुद्ध दिवाणी दावा दाखल केला होता. 'ट्रेडमार्क'चे उल्लंघन, नुकसान भरपाई, पुण्याच्या 'बर्गर किंग'ला आपल्या व्यवसाय चिन्हाच्या (ट्रेड मार्क) वापरावर कायमस्वरूपी मनाई अशा प्रतिबंधक आदेशांसाठी अमेरिकेच्या 'बर्गर किंग'कडून हा दावा दाखल करण्यात आला होता. यात 'बर्गर किंग'च्यावतीने ड. ए. डी. सरवटे, ड. सृष्टी आंगणे आणि ड. राहुल परदेशी यांनी दावा चालवला.

अमेरिकेच्या 'बर्गर किंग'च्या दाव्यानुसार, ही कंपनी अमेरिकेच्या फ्लोरिडा राज्यातील कायद्यांनुसार संचालित केली जाते. ही कंपनी १९५४ मध्ये जेम्स मॅक्लामोर आणि डेव्हिड एडगर्टन यांनी स्थापन केली होती. त्यांनी 'बर्गर किंग' नावाने हॉटेल सुरू केले होते. या साखळी उपाहारगृह उद्योगाच्या अमेरिकेसह जगभरात शंभराहून अधिक देशांत १३ हजार फास्ट फूड उपाहारगृहांच्या शाखा आहेत. 'बर्गर किंग' हे व्यवसाय चिन्ह आणि व्यावसायिक नाव १९५४ पासून ते वापरत आहेत. या कंपनीने २०१४ पासून नवी दिल्लीत आणि नंतर मुंबई व पुण्यात आपली हॉटेल सुरू केली. कंपनीला २००८ मध्ये पुण्यात सारख्याच नावाने आधीच एक हॉटेल सुरू असल्याची माहिती मिळाली. त्यामुळे अमेरिकेच्या कंपनीने जून २००९ मध्ये आपल्या वकिलांमार्फत पुण्यातील 'बर्गर किंग'ला आपला व्यवसाय थांबवण्याची नोटीस बजावून सामंजस्याने हे प्रकरण मिटविण्याचा प्रस्ताव दिला होता. मात्र, या प्रकरणात तडजोड झाली नाही.

## जमीन बळकाविल्याप्रकरणी चौघांवर गुन्हा दाखल

**बारामती । प्रतिनिधी**

संगनमताने बनावट आधार कार्ड तयार करून बेकायदेशीररीत्या जमीन बळकाविण्यासाठी दुय्यम निबंधक कार्यालयात खोटा बिगर ताबा साठेखताचा दस्त करून फसवणूक केल्याची फिर्याद बारामतीतील माजी सैनिक महादेव विठ्ठल कुंभार (वय ६७, रा. पंचायत समितीनजिक, साईगणेशनगर, बारामती) यांनी शहर पोलिसात दिली आहे.

त्यांच्या फिर्यादीवरुन पोलिसांनी महादेव विठ्ठल कुंभार, (रा. मदनेवस्ती, पिराळे नातेपुते ता. माळशिरस जि. सोलापूर), नितीन पंढरीनाथ दांगट (रा. वडगाव बुद्रुक, ता. हवेली), गणेश एकनाथ मगर (रा. मगरपटटा हडपसर ता. हवेली), अशोक केरभाउ भोरडे (मु.पो. पिंपरी सांडस ता. हवेली जि पुणे) यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

## एस.टी.बसने पाठीमागून धडक दिल्याने दुचाकीवरील महिला जागीच ठार

**पुणे । प्रतिनिधी**

परिस्थितीचे भान न ठेवता एस.टी बसचालक नेहमी सुसाट वाहने चालवतात त्या सवयीनुसार पुणे -सातारा महामार्गावरून जाणार्या दुचाकीला सुसाट वेगातील एस.टी.बसने पाठीमागून जोरदार धडक दिल्याने दुचाकीवरील महिला जागीच ठार झाली असून, तीन जण गंभीर जखमी आहेत, यात दोन बालकांचा समावेश आहे. या प्रकरणी एस.टी. चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एस.टी. महामंडळाने अपघातग्रस्त कुटुंबांना आर्थिक नुकसानभरभाई करण्याची आवश्यकता आहे.

गुरुवारी (दि. १५) सकाळी अकराच्या सुमारास सातारा-पुणे महामार्गावर कामथडी (ता. भोर) येथे ही घटना घडली आहे. पूजा सनम कुमारसिंग (वय ३०) असे ठार झालेल्या महिलेचे नाव आहे. सनम दिनेश कुमारसिंग (वय ३३), रोनक सनम सिंग (वय ५), पकुडी सनम सिंग (वय ३, सध्या सर्व रा. पळशी, ता. खंडाळा, जि. सातारा. मूळ रा. बिहार) अशी जखमी झालेल्यांची नावे आहेत. या प्रकरणी नवनाथ गोविंद देशमुख (वय ४८, रा. भोर, ता. भोर) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या एस.टी. बसचालकाचे नाव आहे. परप्रांतीय असलेले सनम कुमारसिंग हे कुटुंबासह पळशी येथे राहत असून, ते शिरवळ येथील एका कंपनीत काम करतात. दुचाकीवरून (एम. एच १२ एन.जी १७७५) फिरायला जात असताना कामथडी येथे त्यांच्या दुचाकीला एस.टी. बस (एम. एच. ७ सी ७५८३) या वरील बसचालक नवनाथ देशमुख याने रस्त्याच्या स्थितीकडे दुर्लक्ष करून हयगयीने व निष्काळजीपणे भरधाव वेगात वाहन चालवून पाठीमागून जोरदार धडक दिली. याप्रकरणी जगदीश शिवाप्पा धुम्मा यांनी फिर्याद दिली असून, पुढील तपास राजगड पोलिस करत आहे.

## अल्पवयीन मुलांनी ३ मुलींचे अश्लील फोटो केले व्हायरल

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातून संतापजनक प्रकार समोर आला आहे. शहरातील एका नामांकित शाळेतील अल्पवयीन मुलांनी तीन मुलींचे छायाचित्रे मॉर्फ करून ती अश्लील छायाचित्रे समाज माध्यमांवर प्रसारित केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. हा प्रकार १६ जून ते ३० जून २०२४ दरम्यान घडला.



या प्रकरणी एका ३६ वर्षीय महिलेने हडपसर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. याप्रकरणी पोलिसांनी तीन अल्पवयीन मुलांना ताब्यात घेतले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांची मुलगी शाळेत शिकत आहे. एका १६ वर्षीय मुलाने त्याच्या मोबाईलमधील ॲपद्वारे फिर्यादीच्या मुलीसह तिच्या दोन मैत्रिणींचे अश्लील छायाचित्र तयार केले. त्याच्या इतर दोन अल्पवयीन मित्रांनी ते सोशल मीडियावर प्रसारित केले. या प्रकरणी पोलिसांनी तीन अल्पवयीन मुलांविरुद्ध विनयभंगाचा गुन्हा दाखल केला आहे.

## सासवड येथील शिबिरात ३१६ जणांचे रक्तदान



**पुणे । प्रतिनिधी**

सासवड सकल मराठा क्रांती मोर्चा यांच्यावतीने सासवड येथे रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. पुरंदरमधील सर्व समाजातील बांधवांनी या शिबिरात मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. या महिलांची व तरुणींची संख्या लक्षणीय होती. यामध्ये ३१६ जणांनी रक्तदान केले.

या शिबिरात ज्यांनी रक्तदान केले, त्यांना महाराष्ट्रात कुठेही रक्ताची गरज भासली तर त्वरित रक्तपुरवठा होईल, असे पुरंदर ब्लड बँक सासवड व अक्षय ब्लड बँक हडपसर यांच्या संचालकांनी सांगितले. यावेळी आमदार संजय जगताप, उद्योजक अनिल जगताप, नंदू जगताप, अभिजित जगताप, हर्षवर्धन पायगुडे, स्वप्नील गायकवाड, महेश सणस, अमोल कड, आकाश शेळके, योगेश कोलते, संदीप राऊत, राहुल कामठे, रामदास बोरकर, भालचंद्र जाधव, संतोष जगताप, पांडुरंग जगताप, सचिन मोकाशी, निखिल सावंत, संदीप कामथे, स्वीकार निगडे, प्रभाकर आढेकर, गणेश बोरकर, शुभम कामथे उपस्थित होते.

# इंदापूरची जागा महायुतीची?; हर्षवर्धन पाटलांनी सगळंच काढलं, भरणे मामांचं टेन्शन वाढवलं

**पुणे । प्रतिनिधी**

निवडणूक आयोगाने दोन राज्यांच्या विधानसभा निवडणुकांच्या तारखा जाहीर केल्या असून महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांचेही वेध सर्वांना लागले आहेत. त्यानुसार, सर्वच राजकीय पक्ष कामाला लागले असून महायुती विरुद्ध महाविकास आघाडी असाच सामना यंदाच्या विधानसभेला रंगणार असल्याचे दिसून येते. त्यामुळे, महाविकास आघाडी आणि महायुतीमध्ये जागावाटपावरुन वाटाघाटी सुरू आहेत. मात्र, या तीन पक्षांच्य जागावाटपात अनेक ठिकाणी बंडखोरी होण्याची शक्यता आहे. त्यातच, बारामतीच्य जागेसंदर्भात अजित पवार यांनी भूमिका मांडली आहे. आता, इंदापूर विधानसभा मतदारसंघावरुन महायुतीत राजकीय संघर्ष निर्माण होण्याची चिन्हे आहेत. कारण, इंदापूरच्या जागेबाबत भाजप नेते आणि आमदार हर्षवर्धन पाटील आग्रही आहेत. तर, अजित पवारांनी लोकसभा निवडणुकांवेळी आम्हाला शब्द दिला होता, असेही त्यांनी म्हटले आहे.

इंदापूरच्या जागेबाबत हर्षवर्धन पाटील यांनी स्पष्ट शब्दात भूमिका उघड केली आहे. त्यामुळे, अजित पवारांच्या राष्ट्रवादीचा विद्यमान आमदार असलेल्या दत्तात्रय भरणेंचं काय होणार, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. गेल्या काही दिवसापासून इंदापूर विधानसभा मतदारसंघ चर्चेत





आहे. भाजपच्या नेत्यांनी आम्हाला महायुतीचा धर्म म्हणून सुनेत्रा पवारांचं काम करायला सांगितलं होतं. तुम्हालाही माहिती आमचा-त्यांचा २५/३० वर्षांचा राजकीय संघर्ष आहे. पण, आम्हाला वरिष्ठांनी सांगितलं म्हणून आम्ही त्यांच्या प्रामाणिकपणे लोकसभेला काम केले. लोकसभेवेळी बंद दारावर चर्चा झाली ती मी इथं सांगणार नाही, अजित पवारांनी देवेंद्र फडणवीसांसमोर कबुल केलं होतं. इंदापूरबाबत जो तुम्ही निर्णय घ्याल, त्याला माझा पाठिंबा आहे, असे म्हणत हर्षवर्धन पाटील यांनी इंदापूरच्या जागेवर दावा केला आहे. दरम्यान, अजून जागा वाटपाची चर्चा होणं बाकी आहे, त्यामुळे ही जागा कुणाला जाते हे पाहणं महत्त्वाचा असणार आहे, असेही हर्षवर्धन पाटील यांनी म्हटले. १९९५ ला आमच्यावर अन्याय झाला त्यावेळी आम्ही उठाव केला, तेव्हापासून आम्ही संघर्ष करीत आहोत. मी सध्या लोकांच्या भावना जाणून घेत आहे. शरद पवार, सुप्रिया सुळे आणि सुनेत्रा पवारांना मदत केली. आम्ही फक्त मदतच करायची का असा सवाल कार्यकर्त्यांच्या मनात आहे. लोकसभेला आमचे नेतृत्व चांगलं असतं, मग असं काय तीन महिन्यात घडतं की ह्यांना बाजूला करा, असा विचार येतो. याचा राग सर्वसामान्य लोकांच्या मनात आहे, असेही पाटील यांनी एबीपी माझाशी बोलताना म्हटले. लोकसभेमध्ये आमची ताकद असते पण विधानसभेला नसते, असं का होतं. काही लोकांची भावना असेल की विधानसभेत हर्षवर्धन पाटील आला नाही पाहिजे. जर आम्ही चांगली माणसं नसू तर आमची लोकसभेला मदत का लागते?, असा सवालही पाटील यांनी विचारला आहे. आम्ही कुणाच्या एक रुपयात मिंदा नाही, त्यांच्या कार्यकर्त्यांनी काय केलं असेल तर मला माहित नाही. हर्षवर्धन पाटलांना एकटा पाडलं पाहिजे का, टार्गेट केलं पाहिजे का, विधानसभेतून बाजूला केलं जातं का? हा संघर्ष अनेक वर्ष झाले सुरू आहे.

### इंदापूरची जागा महायुतीचीच

या निवडणुकीत दोन नेत्यांशी चर्चा झाली आहे देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार. आमचे नेते देवेंद्र फडणवीस आहेत याचा विचार आणि अभ्यास त्यांनी करावा आणि निर्णय घ्यावा. बारामतीची जागा अजित पवारांना जाणार आहे, त्या पक्षाचा उमेदवार कोण असावा हा त्यांचा अधिकार आहे. पण, इंदापूरची जागा राष्ट्रवादीची आहे याबाबत कोणतीही चर्चा झाली नाही. इंदापूरची जागा ही महायुतीची आहे. अजित पवार कुठून उभा राहतील हे माहीत नाही, पण इंदापूरची जागा ही महायुतीची आहे, असे स्पष्ट शब्दात हर्षवर्धन पाटील यांनी म्हटलं आहे.